**नवी दिल्ली :** विहित पात्रता नसलेल्या व्यक्तींना शिक्षक म्हणून नियुक्त करून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळता येणार नाही, अशा कडक शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने आसाम सरकारला सुनावले. आरटीई, एनसीटीई आणि यूजीसी कायद्यांतर्गत आवश्यक पात्रता पूर्ण न करणाऱ्या शिक्षक किंवा ट्यूटरची नियुक्ती करू नये, तसेच अशांना सरकारी सेवेत सामावून घेऊ नये, असे अंतरिम निर्देश सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने दिले.

“पात्रता नसलेल्या लोकांना शिक्षक म्हणून का नियुक्त केले जात आहे?” असा थेट सवाल सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सुनावणीदरम्यान केला. अपात्र व्यक्तींना शिक्षकपदावर बसविण्याची व्यवस्था सुरू राहिल्यास येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होऊ शकते, अशी तीव्र टिप्पणीही त्यांनी केली.

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण सुनावणीस आले. आसाम सरकारच्या एका योजनेला राजेश चौहान यांनी आव्हान दिले आहे. खासगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांना पारदर्शक आणि स्पर्धात्मक भरती न करता थेट सरकारी सेवेत सामावून घेणे हे संविधानातील कलम १४ आणि १६ चे उल्लंघन असल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा आहे.

शिक्षण हा मुलांचा मूलभूत अधिकार असून त्याच्या गुणवत्तेशी तडजोड करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे पात्रता ही शिक्षक नियुक्तीची तडजोड न करता येणारी अट असल्याचा स्पष्ट संदेश या आदेशातून देण्यात आला आहे. आसामपुरता हा आदेश असला तरी अशाच पद्धतीच्या योजना राबविणाऱ्या अन्य राज्यांवरही त्याचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे.

# ‘तुम्ही पोलीस आहात, खोटी माहिती कशी देता?’

## बेकायदा अटकेप्रकरणी विद्यार्थ्याला दोन लाखांची भरपाई
## अकोला प्रकरणात नागपूर खंडपीठाचे पोलिसांना खडे बोल

**नागपूर :** अटकेची कायदेशीर प्रक्रिया न पाळता विद्यार्थ्याला ताब्यात घेणे, अटकेची कारणे न सांगणे आणि त्याचा मोबाईल बेकायदा ताब्यात ठेवणे पोलिसांना चांगलेच महागात पडले आहे. अकोला येथील या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारला संबंधित विद्यार्थ्याला दोन लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. ‘पोलिसांनी न्यायालयासमोर खोटी माहिती कशी दिली?’ असा सवाल करीत न्यायालयाने संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर कठोर टिप्पणी केली.



न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती राज डी. वाकोडे यांच्या खंडपीठाने क्रिमिनल रिट याचिका क्रमांक ३८९/२०२४ मध्ये हा निर्णय दिला. २१ ऑगस्ट रोजी सुनावणी पूर्ण झाल्यानंतर ३१ ऑगस्टला निकाल जाहीर करण्यात आला.

### हॉटेलमधून विद्यार्थ्याला ताब्यात

अकोला येथील २६ वर्षीय वैभव महेंद्रसिंग रघुवंशी हा विद्यार्थी ४ मार्च २०२४ रोजी कुटुंबीयांच्या अनुपस्थितीत ‘महाकाली हॉटेल’चा व्यवसाय पाहत होता. त्यावेळी खदान पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक धनंजय सायरे आणि सहायक पोलिस निरीक्षक निलेश करंदीकर हॉटेलमध्ये आले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यात नेले आणि मोबाईलही घेतल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला.

पोलिसांनी मात्र गुप्त माहितीच्या आधारे हॉटेलवर कारवाई केल्याचे सांगितले. घरगुती वापराचा गॅस सिलिंडर व्यावसायिक वापरासाठी केल्याप्रकरणी अत्यावश्यक वस्तू कायद्याच्या कलम ३ व ७ अंतर्गत गुन्हा दाखल केल्याचे पोलिसांचे म्हणणे होते.

### अटकेपूर्वी कारणे नोंदवणे आवश्यक

या गुन्ह्यातील शिक्षेची कमाल मर्यादा सात वर्षांपर्यंत असल्याने अटक करताना कायदेशीर प्रक्रियेचे पालन आवश्यक होते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या सत्येंदर कुमार अंतिल विरुद्ध सीबीआय या निकालाचा दाखला देत, केवळ गुन्हा दाखल झाला म्हणून अटक करणे बंधनकारक नसल्याचे खंडपीठाने नमूद केले.

अटक आवश्यक असल्यास त्याची कारणे पोलिस अधिकाऱ्याने निश्चित करून लेखी नोंदवणे आवश्यक आहे. अटक आवश्यक नसल्यास संबंधित व्यक्तीला कलम ४१-अन्वये नोटीस देण्याची तरतूद आहे. मात्र, वैभवला कलम ४१ किंवा ४१-अन्वये कोणतीही नोटीस देण्यात आली नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले.

### ‘गुप्त माहिती’चीही नोंद नाही

पोलिस ठाण्याच्या जनरल डायरीसह अन्य नोंदी तपासताना वैभवला अटकेची कारणे सांगितल्याचा कोणताही उल्लेख आढळला नाही. तसेच कारवाईसाठी आधारभूत ठरल्याचे सांगितलेल्या ‘गुप्त माहिती’ची नोंद स्टेशन डायरी, जनरल डायरी किंवा फोन रजिस्टरमध्येही आढळली नाही.

### मोबाईलच्या मुद्द्यावर पोलिसांची कोंडी

पोलिसांनी न्यायालयात दाखल केलेल्या उत्तरात वैभवचा मोबाईल जप्त केला नसल्याचे म्हटले होते. मात्र, मोबाईल परत मिळण्यासाठी त्याने दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज केला होता. पोलिसांचा दावा ग्राह्य न धरता दंडाधिकाऱ्यांनी २ जुलै २०२४ रोजी मोबाईल परत करण्याचे आदेश दिले.

मोबाईल ताब्यात घेताना जप्ती पंचनामा करण्यात आला नव्हता आणि तो पोलिसांच्या ताब्यात ठेवण्यात आला होता, हे विभागीय चौकशीतही स्पष्ट झाले. त्यामुळे पोलिस अधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयासमोर चुकीची माहिती दिल्याचे खंडपीठाने नमूद केले.

### दोन्ही अधिकाऱ्यांवर विभागीय कारवाई

या प्रकरणी झालेल्या विभागीय चौकशीत आरोप सिद्ध झाले. सहायक पोलिस निरीक्षक निलेश करंदीकर यांची एक वर्षाची वेतनवाढ रोखण्यात आली, तर पोलिस निरीक्षक धनंजय सायरे यांच्या मासिक पेन्शनमधून दोन वर्षे दरमहा १,५०० रुपये कपात करण्याची शिक्षा करण्यात आली.

### ‘कायद्याचे रक्षकच कायदा मोडतात तेव्हा...’

घटनेच्या कलम २१ने नागरिकांच्या जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण केले आहे. कायद्याने ठरविलेली प्रक्रिया न पाळता व्यक्तीला ताब्यात घेणे किंवा अटक करणे हा या अधिकाराचा भंग ठरतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

पोलिस हे कायद्याची अंमलबजावणी करणारे असून नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणे त्यांची जबाबदारी आहे. पोलिसांकडूनच कायद्याचे उल्लंघन झाल्यास त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या फौजदारी न्यायव्यवस्थेवरील विश्वासावर होतो, अशी कठोर टिप्पणी खंडपीठाने केली. या सर्व बाबींचा विचार करून याचिका अंशतः मंजूर करीत राज्य सरकारने वैभव रघुवंशी याला दोन लाख रुपयांची नुकसानभरपाई आठ आठवड्यांत द्यावी, असे आदेश न्यायालयाने दिले. ■■■

# उत्सव भक्तीचा; दणदणाटाचा नाही!

उत्सवांच्या नावाखाली नियमांची सर्रास पायमल्ली करण्याची प्रवृत्ती आता थांबली पाहिजे. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे; मात्र भक्तीच्या या उत्सवाला कर्णकर्कश डीजे, प्रचंड आवाजाच्या साउंड सिस्टिम आणि रात्रीची शांतता भंग करणाऱ्या दणदणाटाचे स्वरूप येत असेल, तर त्याला उत्सव म्हणायचे की ध्वनिप्रदूषणाचा उन्माद, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.



ध्वनिप्रदूषणासंबंधीचे नियम हे केवळ कागदावर ठेवण्यासाठी नाहीत. नागरिकांना शांततेत जगण्याचा अधिकार आहे आणि तो कोणत्याही मंडळाच्या उत्सवी अधिकारापेक्षा कमी नाही. त्यामुळे नियम मोडणाऱ्या आयोजकांवर कारवाई झालीच पाहिजे. पोलिसांनीही कोणताही दबाव, प्रतिष्ठा किंवा राजकीय वजन न पाहता कायद्याची समान अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. उत्सव मोठा असला म्हणून कायदा छोटा होत नाही.

डीजे लावणीच्या नावाखाली अश्लीलता, अंगविक्षेप किंवा संस्कृतीच्या नावावर सादर होणारे आक्षेपार्ह कार्यक्रम याबाबतही स्पष्ट भूमिका आवश्यक आहे. कला आणि मनोरंजनाच्या स्वातंत्र्याचा आदर राखतानाच सार्वजनिक कार्यक्रमाची शालीनता आणि कायदेशीर निकषही पाळले गेले पाहिजेत. कार्यक्रमांना परवानगी देण्यापूर्वी आवश्यक प्रमाणपत्रे, परवानग्या आणि कार्यक्रमाचे स्वरूप तपासण्याची यंत्रणा सक्षम झाली, तर नंतर कारवाईची वेळच कमी येईल.

पर्यावरणाचा मुद्दा तर अधिक गंभीर आहे. गणेशभक्तीच्या नावाखाली नद्यांमध्ये, तलावांमध्ये आणि जलस्रोतांमध्ये प्रदूषण वाढवणे ही विसंगती आहे. पर्यावरणीय नियमांचे पालन, पर्यावरणपूरक मूर्तींचा प्रसार आणि विसर्जनासाठी शास्त्रीय व्यवस्था ही काळाची गरज आहे. दरवर्षी उत्सवाच्या तोंडावर आदेश काढण्यापेक्षा पुण्यासाठी कायमस्वरूपी, वैज्ञानिक आणि पर्यावरणस्नेही विसर्जन धोरण आखणे अधिक आवश्यक आहे. प्रश्न उत्सव साजरा करण्याचा नाही; प्रश्न तो कसा साजरा करायचा याचा आहे. श्रद्धा व्यक्त करण्यासाठी कानठळ्या बसवणारा आवाज लागत नाही. संस्कृती जपण्यासाठी अश्लीलतेचा आधार लागत नाही. गणेशभक्ती सिद्ध करण्यासाठी पर्यावरणाची हानी करण्याची गरज नाही. म्हणूनच यंदाच्या उत्सवातून एक स्पष्ट संदेश गेला पाहिजे—भक्तीला कायद्याची जोड, उत्सवाला शिस्तीची किनार आणि विकासाला पर्यावरणाची साथ. उत्सवाची खरी प्रतिष्ठा गर्दीत, आवाजात किंवा झगमगाटात नाही; ती समाजाच्या जबाबदार वर्तनात आहे. दणदणाट कमी झाला म्हणून उत्सवाची भक्ती कमी होत नाही; उलट संयम वाढला तर उत्सवाचे संस्कार अधिक मोठे होतात.

# ‘विलंबाची कारणे नकोत; घरखरेदीदाराचा हक्क द्या!’

## नाशिकच्या गृहखरेदीदाराला ३१.१७ लाख रुपये व्याजासह परत करण्याचे महारेराचे आदेश

**नाशिक :** करारातील निश्चित मुदतीत फ्लॅटचा ताबा न दिल्यास विकासकाची प्रशासकीय किंवा आर्थिक अडचण गृहखरेदीदाराच्या वैधानिक हक्कावर मात करू शकत नाही, असा स्पष्ट कायदेशीर निष्कर्ष महारेराने नोंदविला आहे. नाशिकच्या ‘वॉटरवेज’ प्रकल्पातील फ्लॅटचा ताबा चार वर्षे रखडल्याने गृहखरेदीदाराला प्रकल्पातून माघार घेण्याची परवानगी देत ३१ लाख १७ हजार ४५३ रुपये व्याजासह परत करण्याचे आदेश महारेराने विकासकाला दिले. याशिवाय तक्रारीच्या खर्चापोटी २० हजार रुपये देण्याचे निर्देश आहेत. रेरा कायद्याच्या कलम १८नुसार करारातील ताब्याची मुदत चुकल्यास घरखरेदीदाराला प्रकल्पातून बाहेर पडून भरलेली रक्कम व्याजासह परत मागण्याचा अधिकार असल्याचे या आदेशाने अधोरेखित केले आहे.




महारेराचे सदस्य-२ रवींद्र देशपांडे यांनी हा आदेश दिला. संदीप भित्रे व शुभांगी भित्रे यांनी तक्रार दाखल केली होती. तक्रारदारांच्या वतीने ॲड. गंधार सोनीस यांनी बाजू मांडली. पुण्याचे रहिवासी असलेल्या भित्रे दाम्पत्याने भविष्यातील गुंतवणुकीसाठी नाशिकमधील ‘वॉटरवेज’ प्रकल्पातील A1-901 हा नवव्या मजल्यावरील फ्लॅट खरेदी करण्याचे ठरविले होते.

दोन्ही पक्षांमध्ये १६ डिसेंबर २०१९ रोजी नोंदणीकृत विक्री करार झाला. त्यानुसार ३१ डिसेंबर २०२० पर्यंत ताबा देणे अपेक्षित होते. मात्र, मुदत संपल्यानंतरही ताबा मिळाला नाही. सुमारे चार वर्षे प्रतीक्षा केल्यानंतर तक्रारदारांनी प्रकल्पातून माघार घेऊन भरलेली रक्कम व्याजासह परत करण्याची मागणी केली.

विकासकाने विलंबाचे समर्थन करत एमपीसीबीची स्टॉप वर्क नोटीस, पर्यावरण मंजुरीतील विलंब, पाणीटंचाई, नोटाबंदी आणि कोविड-१९ महामारी आदी कारणे पुढे केली. प्रकल्पाच्या नोंदणीला मुदतवाढ मिळाल्याचे तसेच A1 इमारतीचे ९५ टक्के बांधकाम पूर्ण झाल्याचे सांगून गृहखरेदीदारांनी आणखी प्रतीक्षा करावी, अशी मागणी करण्यात आली.

मात्र, करार करतानाच स्टॉप वर्क नोटीस आणि पर्यावरण मंजुरीची परिस्थिती विकासकाला माहीत होती, असे महारेराने स्पष्ट केले. नोटाबंदी, जीएसटी, पाणीटंचाई आदी कारणांमुळे झालेला विलंब करारातील ताब्याच्या मुदतीतून वगळण्यास पुरेसे कारण असल्याचे विकासक सिद्ध करू शकला नाही, असेही प्राधिकरणाने नमूद केले.

# डॉक्टरांवरील हल्ल्यांवर सर्वोच्च न्यायालयाचा संताप

**पालघर :** डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांवरील वाढत्या हल्ल्यांची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली. ठाण्यातील डोंबिवली रुग्णालयातील डॉक्टरांवरील हल्ल्याच्या प्रकरणाची सुनावणी सुरू असताना पालघरमधील ताज्या घटनेचा उल्लेख झाला. डॉक्टरांवर हल्ला करणाऱ्यांना अशा प्रकारे मोकाट फिरण्याची मुभा देता येणार नाही, अशी तीव्र भूमिका न्यायालयाने व्यक्त केली.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण सुनावणीस आले. डोंबिवलीतील रुग्णालयात डॉक्टरांवर हल्ल्याचा आरोप असलेल्या शिवसेना नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्या जामीनप्रकरणाच्या सुनावणीदरम्यान पालघरमधील घटनेचा संदर्भ आला. त्याच गटाकडून पुन्हा डॉक्टरांवर हल्ला झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर न्यायालयाने डॉक्टरांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली.

पालघरच्या रिलीफ रुग्णालयात दहीहंडी उत्सवादरम्यान जखमी झालेल्या गोविंदांच्या उपचारावरून वाद निर्माण झाला होता. उपचार, रुग्णांना डिस्चार्ज देणे आणि शुल्काच्या मुद्द्यावरून शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयात गोंधळ घातल्याचा आरोप आहे. डॉक्टरांना धमकावणे, शिवीगाळ करणे आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचे प्रकार सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. या प्रकरणी १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पालघर शहरप्रमुख राहुल घरत यांना अटक करण्यात आली आहे. या घटनेची राजकीय पातळीवरही दखल घेण्यात आली.

DEVELOPED NATIONS
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
Journalism for justice

# ‘काय विचारायचे’ पेक्षा ‘काय विचारायचे नाही’ हे शिकलो!

## ६० लाखांचा चेकबाऊन्स खटला, नऊ साक्षीदारांची उलटतपासणी अन् दोन वर्षांची शिक्षा; पहिल्याच मोठ्या खटल्याने दिला फौजदारी वकिलीचा परिपाठ

**१९९६-९७. पुण्यातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय. विवेकानंद मेमोरियल ट्रस्टच्या वतीने ६० लाख रुपयांच्या चेकबाऊन्स प्रकरणात फिर्यादीची बाजू मांडण्याची जबाबदारी माझ्यावर आली. वकिलीच्या सुरुवातीचा काळ, समोर आर्थिक व्यवहारांची गुंतागुंत आणि त्यात बँकिंग व शेअर बाजाराचा संबंध. हा खटला माझ्यासाठी केवळ एक केस नव्हता; तो वकिलीच्या शाळेतील पहिला मोठा धडा होता.**



एआय इमेज




देणगीदारांनी ट्रस्टच्या शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली होती. ही रक्कम सीए जोशी यांच्याकडे देण्यात आली होती. मात्र ती संस्थाकडे न देता त्यातून मालमत्ता खरेदी केल्याचा आरोप होता. पैसे परत मागितल्यानंतर टाळाटाळ सुरू झाली. अखेर जोशी यांनी दिलेला चेक वटला नाही आणि प्रकरण न्यायालयात गेले.


अॅड. प्रतिभा घोरपडे

सुनावणीदरम्यान जोशी यांनी आपल्यावर दबाव आणून बळजबरीने चेक घेतल्याचा दावा केला. फिर्यादीची साक्ष झाल्यानंतर बचाव पक्षाने आठ-नऊ साक्षीदार तपासले. त्यात शेअर ब्रोकर, पोलीस अधिकारी, प्रसिद्ध वृत्तपत्राचे संपादक आणि शेजाऱ्याचाही समावेश होता. प्रत्येक साक्षीदारामागील तथ्य, त्याचा प्रकरणाशी संबंध आणि त्यातून काय सिद्ध किंवा खोडून काढता येईल, याचा बारकाईने अभ्यास करावा लागला.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचा पुरावा तपासल्यानंतर आरोपीला दोन वर्षांची शिक्षा आणि दुप्पट रकमेची नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला. ज्युनिअर वकिल म्हणून हा निकाल माझ्यासाठी महत्त्वाचा होता; पण त्याहून मोठी कमाई होती ती अनुभवाची.

या खटल्यामुळे बँकिंग आणि शेअर बाजार क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करण्याची संधी मिळाली. यापूर्वी या विषयांची फारशी माहिती नव्हती. मात्र न्यायालयीन कामकाजाने एक गोष्ट शिकवली कायद्याची केस हाताळायची असेल, तर त्या केसच्या मुळाशी असलेल्या विषयाचा अभ्यास केल्याशिवाय पर्याय नाही.

या खटल्याने फौजदारी वकिलीचा आणखी एक महत्त्वाचा धडा दिला. आरोपीला काय विचारायचे यापेक्षा काय विचारायचे नाही, हे समजणे अधिक महत्त्वाचे आहे. उलटतपासणी म्हणजे प्रश्नांची सरबत्ती नव्हे. योग्य प्रश्न, योग्य वेळी आणि योग्य मर्यादेत विचारणे हेच खरे कौशल्य आहे.

माझी सनद १९९३ची. मात्र १९९२पासूनच पुण्यातील प्रसिद्ध वकील अॅड. एम. पी. बेंद्रे यांच्याकडे प्रॅक्टिस सुरू केली होती. १९९६मध्ये ३२ आरोपी असलेले एक फौजदारी प्रकरण माझ्याकडे आले. हे प्रकरण घेऊन मी ज्येष्ठ वकील विजयराव मोहिते यांच्याकडे गेले. त्यांनी अॅड. हर्षद निंबाळकर यांच्याकडे पाठवले. अटकपूर्व जामिनावर अंतिम युक्तिवाद करायचा होता. मात्र निंबाळकर सरांना बाहेरगावी जावे लागल्याने त्यांनी मला युक्तिवाद करण्याची संधी दिली.

सरांच्या मार्गदर्शनामुळे आत्मविश्वासाने युक्तिवाद करता आला आणि न्यायालयाने पक्षकाराचा अटकपूर्व जामीन मंजूर केला. त्यानंतर अॅड. विराज काकडे आणि अॅड. हर्षद निंबाळकर यांच्याकडे ज्युनिअरशीप सुरू केली. आमच्या चेंबरमध्ये सुमारे २५ ज्युनिअर होते आणि त्यात मी एकमेव महिला होते.

तो काळ सोपा नव्हता. फौजदारी प्रॅक्टिस करणाऱ्या महिला वकिलांची संख्या बोटावर मोजण्याइतकी होती. मात्र ‘काहीही झाले तरी क्रिमिनल प्रॅक्टिस सोडायची नाही’, हा निर्धार केला. अभ्यास, मेहनत आणि सातत्य या तीन गोष्टींवर भर दिला.

पक्षकारांच्या फीबाबतही सुरुवातीपासून उदारमतवादी भूमिका ठेवली. फीचा आग्रह केला नाही. प्रसिद्धीच्या मागे धावण्यापेक्षा काम प्रामाणिकपणे करण्याला प्राधान्य दिले. सचोटीचा रस्ता सोडायचा नाही, हा विचार आजही कायम आहे.

आज वकिलीच्या कारकीर्दीला तीन दशकांहून अधिक काळ झाला आहे. क्रिमिनल, सिव्हिल, कन्झ्युमर किंवा फॅमिली—प्रकरण कोणतेही असो, त्यातून काहीतरी शिकता येते. नवीन वकिलांनी केसची पार्श्वभूमी, घटना आणि कायद्याचा सखोल अभ्यास करावा. मेहनत आणि सातत्याला पर्याय नाही. प्रसिद्धीच्या मागे जाण्यापेक्षा कामाला प्रतिष्ठा मिळवून देणे महत्त्वाचे आहे.

आज एआयचा वापर वकिली क्षेत्रातही वाढला आहे. ड्राफ्टिंग आणि संशोधनासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो; मात्र अभ्यासाशिवाय त्यावर अवलंबून राहणे धोकादायक आहे. कायदेशीर मसुद्यातील छोटी चूकही गंभीर परिणाम करू शकते. भविष्यात कितीही आधुनिक साधने आली, तरी वकिलांनी स्वतःच्या लिखाणाचा आणि कायदेशीर मांडणीचा सराव सोडता कामा नये.

पहिल्या खटल्याकडे मागे वळून पाहताना जाणवते—न्यायालयात पहिली केस जिंकणे महत्त्वाचे असते; पण पहिल्या केसने आपल्याला काय शिकवले, हे त्याहून महत्त्वाचे असते. माझ्यासाठी त्या ६० लाखांच्या खटल्याने दिलेला हा धडा आजही तितकाच जिवंत आहे.

(तीन दशकांहून अधिक काळ वकिली व्यवसायात कार्यरत. शिवाजीनगर जिल्हा व सत्र न्यायालयात क्रिमिनल तसेच कौटुंबिक न्यायालयात वरिष्ठ वकील म्हणून प्रॅक्टिस.)

✦ शब्दांकन : अॅड. युगंधर ताजणे

### एआयच्या काळात लिखाणाचा सराव

एआय वापरा; पण अभ्यासाची जागा देऊ नका! ड्राफ्टिंगसाठी एआयचा वापर करताना कायदेशीर अचूकता स्वतः तपासा. तंत्रज्ञान बदलत राहील; मात्र वकिलाची लेखनशैली, कायदेशीर विचार आणि युक्तिवादाची क्षमता स्वतःच्या सरावातूनच घडते.

### नवोदित वकिलांसाठी

केस कोणतीही असो; ‘नाही’ म्हणू नका!

क्रिमिनल, सिव्हिल, कन्झ्युमर किंवा फॅमिली—सुरुवातीला प्रत्येक प्रकरणातून शिकण्याची संधी घ्या. केसच्या घटना, कायदा आणि पार्श्वभूमीचा अभ्यास करा. मेहनत, सातत्य आणि प्रामाणिकपणाला पर्याय नाही.

---

# लोकशाहीची खरी ताकद नागरिकांत!

भारताची लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून गौरवली जाते. विविध भाषा, धर्म, जाती, संस्कृती आणि विचारप्रवाहांना सामावून घेणारी ही व्यवस्था केवळ निवडणुका घेऊन जिवंत राहत नाही. लोकशाहीची खरी परीक्षा मतदानाच्या दिवशी नव्हे, तर त्यानंतर सुरू होते. नागरिक प्रश्न विचारतात का, सत्तेच्या निर्णयांची चिकित्सा करतात का, कायद्याचा आदर करतात का आणि स्वतःच्या हक्कांसोबत कर्तव्यांची जाणीव ठेवतात का, यावर लोकशाहीचे बळ ठरते.

भारतीय संविधानाने नागरिकांना समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार दिला. संविधानाच्या प्रस्तावनेतील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये केवळ पुस्तकातील शब्द नाहीत; ती भारतीय लोकशाहीच्या अस्तित्वाची मूलभूत तत्त्वे आहेत. त्यामुळे संविधानाचे रक्षण करणे ही केवळ न्यायालये, सरकार किंवा लोकप्रतिनिधींची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

लोकशाही म्हणजे ‘लोकांचे, लोकांद्वारे आणि लोकांसाठी चालणारे शासन’. मात्र लोकांनी प्रतिनिधी निवडले आणि आपली जबाबदारी संपली, असा समज लोकशाहीसाठी घातक आहे. मतदान हा अधिकार आहे; पण निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या कामावर लक्ष ठेवणे, चुकीच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे, सार्वजनिक हितासाठी आवाज उठविणे आणि कायदेशीर मार्गाने विरोध नोंदविणे ही जबाबदार नागरिकाची भूमिका आहे.

लोकशाहीची रचना कायदेमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका या तीन प्रमुख स्तंभांवर उभी आहे. संसद आणि विधिमंडळे कायदे करतात, सरकार त्यांची अंमलबजावणी करते आणि न्यायपालिका संविधान व कायद्याचे संरक्षण करते. कोणतीही संस्था संविधानापेक्षा मोठी नाही.

**डॉ. आत्माराम शेळके**
सहयोगी प्राध्यापक, सिंबायोसिस लॉ स्कूल, पुणे

**डॉ. भूपेश गोपाळ चिंतामणी**
सहायक प्राध्यापक, सिंबायोसिस लॉ स्कूल, पुणे

सत्तेला मर्यादा असणे आणि त्या मर्यादांचे पालन करणे, हेच घटनात्मक लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे.

यामुळेच संविधानाच्या मूलभूत रचनेचे संरक्षण हा लोकशाहीचा महत्त्वाचा आधार आहे. बहुमत मिळाले म्हणून सत्तेला अमर्याद अधिकार मिळत नाहीत. बहुमत हे शासन करण्याचे साधन आहे; संविधान बदलून मनमानी करण्याचा परवाना नव्हे. संस्थात्मक स्वायत्तता, कायद्याचे राज्य आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार यांचे रक्षण झाले तरच लोकशाही अर्थपूर्ण ठरते.

आज सोशल मीडियाने प्रत्येकाला व्यक्त होण्याचे व्यासपीठ दिले आहे. ही लोकशाहीची ताकद आहे; पण त्याच माध्यमातून अफवा, अर्धसत्य आणि दिशाभूल करणारी माहितीही क्षणार्धात पसरते. त्यामुळे ‘मला वाटते’ आणि ‘सत्य काय आहे’ यातील फरक नागरिकांनी ओळखला पाहिजे. मतभेद असणे लोकशाहीचे लक्षण आहे; पण तथ्याशिवाय आरोप, द्वेष आणि खोट्या माहितीचा प्रसार हा लोकशाहीला कमकुवत करणारा धोका आहे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ इतरांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करण्याचा अधिकार नव्हे. स्वतःच्या अधिकारांची मागणी करताना समोरच्याच्या अधिकारांचा आदर करणे आवश्यक आहे. समानतेची भाषा करताना भेदभाव टाळणे, स्वातंत्र्याचा आग्रह धरताना जबाबदारी स्वीकारणे आणि अधिकार सांगताना कर्तव्य विसरू नये, ही लोकशाहीची खरी शिस्त आहे.

आज नागरिक शासनाकडून पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि न्यायाची अपेक्षा करतात. ही अपेक्षा रास्त आहे. पण त्याच वेळी नागरिकांनीही कायद्याचे पालन, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, पर्यावरणाची काळजी, सामाजिक सलोखा आणि संविधानिक मूल्यांचा आदर या जबाबदाऱ्या स्वीकारल्या पाहिजेत. अधिकार आणि कर्तव्ये यांच्यातील संतुलन बिघडले की लोकशाहीचा गाभाच दुर्बल होतो.

लोकशाहीतील नागरिक हा केवळ मतदार किंवा सरकारी योजनांचा लाभार्थी नाही; तो शासनव्यवस्थेचा सक्रिय भागधारक आहे. सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे जितके आवश्यक, तितकेच स्वतःच्या वर्तनाची चिकित्सा करणेही आवश्यक आहे. रस्त्यावर नियम तोडून सरकारला शिस्तीचे धडे देणे, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करून प्रशासनावर टीका करणे किंवा खोटी माहिती पसरवून लोकशाहीची चिंता व्यक्त करणे, हा विरोधाभास आहे.

लोकशाहीला मजबूत करण्यासाठी मोठमोठ्या घोषणा नव्हे, तर जागरूक नागरिकांची गरज आहे. प्रश्न विचारणारा नागरिक सत्तेला जबाबदार ठेवतो; विवेकाने मतदान करणारा नागरिक राजकारणाची दिशा ठरवतो; कायद्याचा आदर करणारा नागरिक समाजात शिस्त निर्माण करतो आणि संविधानिक मूल्यांसाठी उभा राहणारा नागरिक लोकशाहीचे भवितव्य सुरक्षित करतो.

म्हणूनच लोकशाहीची खरी ताकद संसद भवनात, मंत्रालयात किंवा न्यायालयाच्या इमारतीतच नाही; ती सामान्य नागरिकाच्या विवेकात आहे. हक्क मागताना कर्तव्य विसरले आणि स्वातंत्र्य उपभोगताना जबाबदारी टाळली, तर लोकशाही केवळ मतदानाची यंत्रणा उरेल. हक्कांसोबत कर्तव्यांची जाणीव ठेवणारे नागरिक घडले, तरच लोकशाही खऱ्या अर्थाने लोकांची राहील.

# वकील झालो; कारण सामान्य माणसाला आवाज हवा होता

**समाजात वावरताना रोज असंख्य चेहरे दिसतात. काही चेहऱ्यांवर समाधानाचे हास्य असते, तर काहींच्या डोळ्यांत अन्याय, असहायता आणि उद्याची चिंता दडलेली असते. या चेहऱ्यांमध्ये सर्वाधिक अस्वस्थ करणारा चेहरा असतो तो सामान्य माणसाचा. पिण्याच्या पाण्यासाठी, रस्त्यासाठी, नालीसाठी, साध्या सरकारी कागदासाठी किंवा आपल्या हक्काच्या कामासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवणारा माणूस पाहिला की एक प्रश्न मनात वारंवार उभा राहतो. या माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार कोण?**

हा प्रश्नच माझ्या वकिलीच्या प्रवासाचा प्रारंभबिंदू ठरला. वकिली माझ्यासाठी केवळ काळा कोट, न्यायालयातील युक्तिवाद किंवा उपजीविकेचे साधन नाही. सामान्य माणसाला त्याचा हक्क मिळवून देण्यासाठी कायद्याची ताकद त्याच्या हातात देणे, अन्यायासमोर त्याचा आवाज बुलंद करणे आणि प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून देणे, हा या व्यवसायामागचा माझा मूलभूत हेतू आहे.

कायद्याची भीती ही सामान्य माणसाच्या मनातील मोठी अडचण आहे. 'कोर्ट-कचेरी म्हणजे मोठ्या लोकांचे काम', 'सरकारी कार्यालयात आपले कोण ऐकणार?' किंवा 'कायदा आपल्याला कुठे कळतो?' अशी भावना अनेकांच्या मनात असते. प्रत्यक्षात संविधान आणि कायदे हे नागरिकाला घाबरवण्यासाठी नव्हे, तर त्याच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आहेत. माहितीचा अभाव, योग्य मार्गदर्शनाचा अभाव आणि प्रशासनाच्या दारात वारंवार होणारी हेलपाटी यामुळे मात्र नागरिक अन्याय गिळून गप्प बसतो. हीच गप्प बसण्याची मानसिकता मोडायची असेल तर कायद्याचे ज्ञान सामान्य माणसापर्यंत पोहोचले पाहिजे.

माझ्या मनात समाजसेवेची बीजे लहानपणीच पडली. माझे वडील ग्रामपंचायत सदस्य म्हणून काम करत असताना परिसरातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी घेतलेली धावपळ मी जवळून पाहिली. लोकांचे प्रश्न ऐकणे, त्यांच्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करणे आणि सार्वजनिक कामांसाठी संघर्ष करणे हा त्यांच्या कामाचा अविभाज्य भाग होता. त्या अनुभवातून एक गोष्ट स्पष्ट झाली. सेवा करण्याची इच्छा असेल, तर त्याला योग्य ज्ञानाची आणि संघर्षाची जोडही असली पाहिजे.

आज पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो, रस्त्यांवरील खड्डे असोत, रस्त्यांचे रुंदीकरण असो, ड्रेनेजची समस्या असो किंवा सासवड रस्त्यावरील वाहतूक कोंडी असो; केवळ निवेदने देऊन, घोषणा करून किंवा भाषणे करून प्रश्न कायमचे सुटत नाहीत. प्रशासनाला त्याच्या कर्तव्याची कायदेशीर जाणीव करून द्यावी लागते. कोणत्या अधिकाऱ्याची कोणती जबाबदारी आहे, नागरिकाचा कोणता अधिकार आहे आणि प्रशासनाला कायद्याच्या चौकटीत कसे उत्तरदायी करता येते, हे समजणे तितकेच महत्त्वाचे आहे.


ॲड. अमोल मारुतराव कापरे
(B.Com., LL.B., GDC&A)

म्हणूनच माझ्यासाठी कायद्याचे शिक्षण म्हणजे केवळ पदवी नव्हे. ते सामान्य माणसाच्या प्रश्नांना दिशा देणारे साधन आहे. कायद्याचे कलम कागदावर असले तरी त्याचा उपयोग नागरिकाच्या आयुष्यात झाला, तरच त्या कायद्याचे खरे सार्थक होते. अन्यथा कायद्याची पुस्तके ग्रंथालयात धूळ खात राहतील आणि सामान्य माणूस कार्यालयांच्या पायऱ्या झिजवत राहील.

वकिलीच्या व्यवसायात अनेक प्रकारची माणसे भेटतात. काही आर्थिकदृष्ट्या सक्षम असतात, काही सामाजिकदृष्ट्या प्रभावशाली असतात; पण न्यायाची गरज सर्वांनाच असते. विशेषतः गरिबाच्या हातात पैसा नसला, ओळख नसली किंवा राजकीय ताकद नसली तरी त्याच्याकडे संविधानाने दिलेले अधिकार आहेत. त्या अधिकारांची जाणीव करून देणे आणि त्यासाठी कायदेशीर लढा देणे ही वकिलाची सामाजिक जबाबदारी आहे, असे मला वाटते.

माझ्यासाठी न्यायालयातील काळा कोट हा प्रतिष्ठेचा विषय नसून विश्वासाची निशाणी आहे. एखादा सामान्य नागरिक आपली अडचण घेऊन वकिलाकडे येतो, तेव्हा तो केवळ कायदेशीर सल्ला मागत नसतो; तो आपल्या संकटातून बाहेर पडण्याची आशा घेऊन आलेला असतो. त्या विश्वासाला तडा जाऊ न देणे, त्याला योग्य कायदेशीर मार्ग दाखवणे आणि त्याच्या हक्कासाठी प्रामाणिकपणे उभे राहणे, हीच खरी वकिली.

वकील होणे सोपे; पण सामान्य माणसाचा वकील होणे कठीण. कारण त्यासाठी केवळ कायद्याची पदवी पुरेशी नसते. त्यासाठी संवेदनशील मन, सामाजिक बांधिलकी, प्रशासनाला प्रश्न विचारण्याचे धैर्य आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची तयारी लागते. माझ्या दृष्टीने वकिलीची खरी कसोटी न्यायालयात किती युक्तिवाद केला यापेक्षा, आपल्या कायद्याच्या ज्ञानामुळे किती सामान्य माणसाला त्याचा हक्क मिळाला यात आहे.

माझे शिक्षण—B.Com., LL.B., GDC&A—हे माझ्या नावामागे लागणारे शब्द नाहीत; ते समाजाप्रती असलेल्या जबाबदारीची साधने आहेत. कायद्याचे ज्ञान माझे शस्त्र आहे; पण त्या शस्त्राचा उपयोग कोणाविरुद्ध करायचा यापेक्षा तो कशासाठी करायचा, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. तो अन्यायाविरुद्ध, भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध आणि हक्कांपासून वंचित ठेवणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध असला पाहिजे.

आजही माझ्यासमोर तोच प्रश्न आहे. सामान्य माणूस आपल्या हक्कासाठी कोणाकडे पाहणार? माझे उत्तर स्पष्ट आहे. त्याने कोणापुढेही लाचार होऊ नये. कायदा त्याच्या पाठीशी आहे, संविधान त्याच्या पाठीशी आहे आणि त्याच्या हक्कांसाठी कायदेशीर मार्गाने लढणारे हात त्याच्या सोबत असले पाहिजेत.

म्हणूनच मी वकील झालो. केवळ स्वतःची कारकीर्द घडवण्यासाठी नव्हे; तर ज्याचा आवाज ऐकला जात नाही, त्याचा आवाज बनण्यासाठी. ज्याला व्यवस्था दुर्लक्षित करते, त्याला कायद्याची ताकद देण्यासाठी. आणि ज्याला अन्यायापुढे झुकावे लागते, त्याच्यासमोर न्यायाचा मार्ग उभा करण्यासाठी.

'तुमच्यावर अन्याय झाला तर गप्प बसू नका; कायद्याच्या दारात तुमचा आवाज पोहोचवणारा माणूस तुमच्यासोबत आहे' ही भावना माझ्या वकिलीची खरी ओळख आहे.

# गणेशभक्तांचा कोकण प्रवास टोलमुक्त

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**मुंबई :** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांना ११ ते २७ सप्टेंबरदरम्यान टोलमाफी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुंबई-बेंगळुरू (रा.म. ४८), मुंबई-गोवा (रा.म. ६६), कोकणाकडे जाणारे सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे रस्ते तसेच अटल सेतूवरील टोल नाक्यांवर ही सवलत लागू राहील. गणेशभक्तांना 'गणेशोत्सव २०२६ कोकण दर्शन' असे स्टीकर स्वरूपातील टोलमाफी पास देण्यात येणार आहेत. वाहन क्रमांक व चालकाचे नाव असलेले हे पास संबंधित पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौकी किंवा आरटीओ कार्यालयातून उपलब्ध करून दिले जातील. हा पास परतीच्या प्रवासासाठीही ग्राह्य राहणार आहे. कोकणात जाणाऱ्या एसटी बसेसनाही टोलमाफी मिळणार असून, संबंधित जिल्ह्यातील पोलीस किंवा आरटीओकडून बसेससाठी पास दिले जातील. पासची उपलब्धता आणि वितरणाबाबत पोलीस व परिवहन विभागाने जनतेला माहिती देण्याच्या सूचनाही शासनाने दिल्या आहेत.



**- यशवंत लाखेपाटील**
श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय, पुणे

कोकण गणेशोत्सव - २०२६
"गणेश दर्शन"
पथकर माफी (टोल फ्री) पास

वाहन क्र. :
मालकाचे नाव :
भ्रमणध्वनी क्र. :
मार्ग : ते
प्रवासाची तारीख : जाण्याची तारीख
येण्याची तारीख

सक्षम अधिकारी यांची सही व शिक्का

# कायद्याच्या वाटचालीतील १२ महत्त्वाचे सिद्धांत




**१. सार आणि तत्त्वाचा सिद्धांत - Doctrine of Pith and Substance**

केंद्र आणि राज्यांच्या कायदे करण्याच्या अधिकारात संघर्ष झाल्यास, न्यायालय संबंधित कायद्याचा बाह्य आवाका नव्हे, तर त्याचा मूळ हेतू आणि गाभा तपासते. त्या कायद्याचा खरा विषय कोणत्या अधिकारक्षेत्रात येतो, यावर त्याची वैधता ठरते.

**२. हक्क सोडण्याचा सिद्धांत - Doctrine of Waiver**

भारतीय नागरिकाला आपले मूलभूत हक्क केवळ स्वतःच्या इच्छेने सोडता येत नाहीत. हे हक्क संविधानाने दिलेले संरक्षण असल्याने त्यांचा त्याग करण्याचा अधिकार व्यक्तीला सामान्यतः नाही.

**३. सार्वत्रिक अधिकारक्षेत्राचा सिद्धांत - Doctrine of Universal Jurisdiction**

नरसंहार, युद्धगुन्हे, चाचेगिरी यांसारखे गंभीर आंतरराष्ट्रीय गुन्हे केवळ एका देशापुरते मर्यादित राहत नाहीत. विशिष्ट परिस्थितीत गुन्हा कुठे घडला किंवा आरोपी कोणत्या देशाचा आहे, याची पर्वा न करता अन्य देशातील न्यायालयालाही कारवाईचा अधिकार असू शकतो.

**४. करार पाळण्याचा सिद्धांत - Pacta Sunt Servanda**

आंतरराष्ट्रीय कायद्यातील मूलभूत तत्त्वानुसार, देशांनी केलेले वैध तह आणि करार प्रामाणिकपणे व सद्भावनेने पाळणे बंधनकारक असते. करारावर स्वाक्षरी करून त्यापासून मनमानीने माघार घेता येत नाही.

**५. हस्तक्षेप न करण्याचा सिद्धांत - Doctrine of Non-Intervention**

एका स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राने दुसऱ्या देशाच्या अंतर्गत राजकारणात किंवा अंतर्गत कारभारात अनुचित हस्तक्षेप करू नये. राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा आणि स्वनिर्णयाच्या अधिकाराचा आदर हे या तत्त्वाचे केंद्र आहे.

**६. राज्याला जबाबदार धरण्याचे तत्त्व - Attributable to the State**

एखाद्या देशाचे सरकारी अधिकारी, सैनिक किंवा अधिकृत यंत्रणा दुसऱ्या देशात बेकायदेशीर कृती करीत असल्यास, त्या कृतीची जबाबदारी केवळ संबंधित व्यक्तीपुरती मर्यादित राहत नाही. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या निकषांनुसार ती राज्याशी जोडली जाऊ शकते.

**७. 'आकाश कोसळले तरी न्याय झाला पाहिजे'- Fiat Justitia Ruat Caelum**

परिस्थिती कितीही कठीण असली तरी न्यायाच्या तत्त्वांपासून विचलित होता कामा नये. व्यक्तीगत, सामाजिक किंवा राजकीय दबावापेक्षा न्यायाचे तत्त्व सर्वोच्च राहिले पाहिजे.

**८. जनतेचे कल्याण हाच सर्वोच्च कायदा - Salus Populi Suprema Lex**

राज्यकारभाराचा अंतिम उद्देश जनतेचे कल्याण असतो. सार्वजनिक हित, नागरिकांची सुरक्षितता आणि समाजाचे व्यापक कल्याण यांना कायद्याच्या अंमलबजावणीत विशेष महत्त्व दिले जाते.

**९. खरेदीदाराने सावध असावे - Caveat Emptor**

वस्तू खरेदी करण्यापूर्वी तिची गुणवत्ता, स्वरूप आणि योग्यतेची तपासणी करण्याची जबाबदारी सामान्यतः खरेदीदारावर असते. म्हणूनच व्यवहार करताना खरेदीदाराने दक्ष राहणे आवश्यक आहे.

**१०. दुसऱ्यामार्फत केलेले कृत्य स्वतः केल्यासारखे - Qui Facit Per Alium Facit Per Se**

एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीमार्फत एखादी कृती करवून घेतली, तर कायद्याच्या दृष्टीने ती कृती त्याने स्वतः केल्याप्रमाणे मानली जाऊ शकते. प्रतिनिधी, एजंट किंवा अधिकृत व्यक्तीमार्फत केलेल्या व्यवहारांमध्ये हे तत्त्व महत्त्वाचे ठरते.

**११. कायदा जागरूकांना मदत करतो, निष्काळजींना नाही - Vigilantibus Non Dormientibus Jura Subveniunt**

आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून योग्य वेळी कायदेशीर उपाययोजना करणे आवश्यक आहे. हक्कांच्या संरक्षणासाठी अनावश्यक विलंब केल्यास, त्या विलंबाचा कायदेशीर उपाय मिळण्यावर परिणाम होऊ शकतो.

**१२. एका बाबतीत खोटे म्हणजे सर्व बाबतीत खोटे - Falsus in Uno, Falsus in Omnibus**

या तत्त्वाचा शब्दशः अर्थ असा असला तरी भारतीय न्यायव्यवस्थेत हा कठोर आणि अनिवार्य नियम नाही. साक्षीदाराच्या कथनातील काही भाग खोटा ठरला तरी न्यायालय विश्वासार्ह भाग स्वतंत्रपणे तपासून स्वीकारू शकते आणि अविश्वसनीय भाग नाकारू शकते.

# सार्वजनिक गणेशोत्सवाचे नवे पर्व

**पेशवेकालीन देवघरापासून टिळकांच्या सनदशीर स्वातंत्र्यलढ्यापर्यंत आणि विकसित भारताच्या भावी वाटचालीपर्यंत**





ॲड. विशाल विजयराव काळे
मार्गदर्शक, डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

गणेशोत्सव हा केवळ भाद्रपदातील धार्मिक उत्सव नाही; तो महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्रचनेचा, लोकसंघटनाचा आणि नागरी शिस्तीचा जाज्वल्य इतिहास आहे. पेशवेकालीन वाड्यांच्या देवघरातून सार्वजनिक चौकात आलेल्या या उत्सवाने लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्याला लोकशक्ती दिली. आज भारत विकसित राष्ट्र होण्याचे स्वप्न पाहत असताना सार्वजनिक गणेशोत्सवापुढेही एक मूलभूत प्रश्न उभा आहे—उत्सवाची ऊर्जा केवळ रोषणाई, ध्वनिवर्धक आणि मिरवणुकीत खर्च होणार की ती राष्ट्रनिर्मितीच्या कामी लागणार?

### ✦ देवघरातून चौकात

महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला ऐतिहासिक परंपरा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून गणेशभक्तीला राजाश्रय आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळाली. पेशवेकाळात पुण्यातील शनिवारवाड्यातील गणेश महालात भाद्रपदातील उत्सवाला दरबारी वैभव लाभले. कीर्तन, संगीत, नृत्य, धार्मिक कार्यक्रम आणि विद्वानांना दक्षिणा अशा स्वरूपात हा उत्सव साजरा होत असे. मात्र, या उत्सवाची व्याप्ती प्रामुख्याने राजदरबार, वाडे आणि घराण्यांपुरती मर्यादित होती. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यानंतर राजाश्रय संपला आणि सार्वजनिक जमावांवर ब्रिटिश सत्तेचे निर्बंध वाढले. गणेशोत्सव पुन्हा घराघरांतील धार्मिक परंपरेत बंदिस्त झाला.

### ✦ टिळकांनी उत्सवाला दिले लोकशक्तीचे रूप

१८९०च्या दशकात लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी धार्मिक भावनेला सामाजिक आणि राष्ट्रीय संघटनशक्तीची जोड दिली. भाऊसाहेब रंगारी यांनी १८९२मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना टिळकांनी व्यापक सामाजिक अधिष्ठान दिले. १८९३मध्ये 'केसरी'तून सार्वजनिक गणेशोत्सवाची भूमिका मांडत त्यांनी उत्सवाला लोकजागृतीचे स्वरूप दिले. १८९४मध्ये स्वतः गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करून या चळवळीला व्यापक जनाधार मिळवून दिला.

ही केवळ धार्मिक कल्पनेची पुनरावृत्ती नव्हती; ती तत्कालीन कायदेशीर आणि राजकीय परिस्थितीचे सूक्ष्म आकलन असलेली लोकसंघटनाची रणनीती होती. ब्रिटिश राजवटीने राजकीय सभा आणि संघटनांवर निर्बंध आणले होते. अशा परिस्थितीत सांस्कृतिक आणि धार्मिक व्यासपीठाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणणे, प्रबोधन करणे आणि स्वाभिमान जागवणे शक्य झाले. गणेशोत्सवाचा मंडप हा त्यामुळे केवळ पूजेचे ठिकाण राहिला नाही; तो लोकशिक्षणाचा वर्ग, सामाजिक संवादाचे व्यासपीठ आणि राष्ट्रभावनेचा जागर बनला.

### ✦ मंडपात जागला स्वातंत्र्याचा हुंकार

टिळकांच्या सार्वजनिक गणेशोत्सवाने जात, पंथ, आर्थिक स्तर यांपलीकडे लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. मेळे, पोवाडे, व्याख्याने, नाट्यप्रयोग आणि सामाजिक प्रबोधनातून पारतंत्र्याविरुद्धची अस्वस्थता जनमानसात पोहोचली. स्वदेशीचा विचार, आत्मनिर्भरतेची भावना आणि राष्ट्रीय अस्मिता या माध्यमातून बळकट झाली. सार्वजनिक उत्सव हा समाजातील विविध घटकांना एकाच सार्वजनिक अवकाशात आणणारा प्रयोग ठरला.

म्हणूनच सार्वजनिक गणेशोत्सवाचा इतिहास हा केवळ धार्मिक इतिहास नाही; तो भारतातील लोकशाहीपूर्व लोकसंघटनाच्या उत्क्रांतीचाही इतिहास आहे.

### ✦ आता उत्सवाची कसोटी वेगळी

स्वातंत्र्यानंतर परिस्थिती बदलली. राजकीय स्वातंत्र्य मिळाले; संविधान आले; नागरिकांना मूलभूत अधिकार मिळाले. परंतु त्याचबरोबर नागरिकांची कर्तव्येही संविधानाने स्पष्ट केली. आज सार्वजनिक गणेशोत्सवाची खरी परीक्षा याच ठिकाणी आहे.

ध्वनीप्रदूषण, वाहतूक कोंडी, अनधिकृत मंडप, रस्ते अडविणे, कचरा, पाण्याचा अपव्यय आणि अवाजवी खर्च या प्रश्नांनी उत्सवाच्या सामाजिक हेतूलाच प्रश्न विचारला आहे. धार्मिक स्वातंत्र्य हा संविधानाने दिलेला अधिकार आहे; परंतु कोणताही अधिकार दुसऱ्याच्या अधिकारांवर अतिक्रमण करण्याची मुभा देत नाही. उत्सव साजरा करण्याचा अधिकार आणि सार्वजनिक शांतता, आरोग्य, वाहतूक व पर्यावरण यांचे संरक्षण—दोन्हींचा समतोल राखणे हीच कायद्याच्या अधिराज्याची खरी कसोटी आहे.

### ✦ 'विकसित भारता'चा गणेशोत्सव कसा असावा?

भारत विकसित राष्ट्र बनविण्याचा संकल्प करीत आहे. मग सार्वजनिक गणेशोत्सवही विकसित नागरी संस्कृतीचे उदाहरण बनायला हवा. मंडप मोठा असण्यापेक्षा त्यातून होणारे सामाजिक काम मोठे असावे. डेसिबलची पातळी वाढण्यापेक्षा समाजातील संवेदनशीलतेची पातळी वाढली पाहिजे. वर्गणीची रक्कम सजावटीत संपण्यापेक्षा तिचा काही हिस्सा गरजूंच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणारा ठरला पाहिजे.

यासाठी प्रत्येक गणेश मंडळाने 'उत्सवातून समाजसेवा' ही संकल्पना स्वीकारण्याची वेळ आली आहे.

### ✦ तीन सूत्रे नव्हे, नागरिकत्वाची नवी दिशा

✦ **पहिले-** एक दिवस समाजासाठी. दहा दिवसांच्या उत्सवातील किमान एक दिवस श्रमदानासाठी द्यावा. परिसरातील खड्डे, उघडी गटारे, सार्वजनिक जागेतील कचरा, पाण्याची नासाडी आणि अस्वच्छता याविरुद्ध नागरिकांनी प्रत्यक्ष काम करावे.

✦ **दुसरे -** मंडपातून आरोग्यसेवा. स्थानिक डॉक्टरांच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान, नेत्रतपासणी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य मार्गदर्शन असे उपक्रम राबवावेत.

✦ **तिसरे -** मंडपातून कायदेविषयक मदत. वकिलांनी पुढाकार घेऊन ज्येष्ठ नागरिक, महिला, कामगार, विद्यार्थी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना त्यांच्या हक्कांविषयी मोफत प्राथमिक कायदेविषयक मार्गदर्शन द्यावे. सरकारी योजनांची माहिती, मालमत्ता-विवाद, कौटुंबिक प्रश्न आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांबाबत जनजागृती केली तर गणेश मंडप हा खऱ्या अर्थाने लोकशाहीचा वर्ग बनेल.

याशिवाय प्रत्येक मंडळाने आपल्या परिसरातील एखाद्या गरजू कुटुंबाला वर्षभर आधार देण्याची जबाबदारी स्वीकारली, तर वर्गणीचा अर्थच बदलेल. एका कुटुंबाच्या औषधांचा खर्च, एखाद्या विद्यार्थ्याची शैक्षणिक मदत किंवा एखाद्या गरजू कुटुंबाचे अन्नधान्य हीच गणरायाच्या चरणी खरी सेवा ठरेल.

### ✦ कायद्याचे अधिराज्य म्हणजे उत्सवाला विरोध नव्हे

कायद्याचे पालन करणे म्हणजे धार्मिक उत्साहावर बंधने आणणे नव्हे. उलट, कायद्याचे अधिराज्यच प्रत्येक नागरिकाच्या श्रद्धेला सुरक्षित ठेवते. आवाजाच्या मर्यादा पाळणे, वाहतूक सुरळीत ठेवणे, अग्निसुरक्षा आणि विद्युत सुरक्षेचे नियम पाळणे, मंडपासाठी आवश्यक परवानग्या घेणे, स्वच्छता राखणे आणि सार्वजनिक जागेचा जबाबदारीने वापर करणे—ही धर्मविरोधी नव्हे, तर संविधाननिष्ठ आचरणाची चिन्हे आहेत.

लोकमान्य टिळकांनी ज्या सार्वजनिक गणेशोत्सवाचा उपयोग परकीय सत्तेला प्रश्न विचारण्यासाठी केला, त्याच उत्सवाचा उपयोग आज आपण स्वतःच्या सामाजिक कमतरतांना प्रश्न विचारण्यासाठी केला पाहिजे. तेव्हा प्रश्न ब्रिटिश सत्तेचा होता; आज प्रश्न आपल्या नागरी विवेकाचा आहे.

### ✦ गणरायासमोरचा आजचा संकल्प

टिळकांनी धार्मिक श्रद्धेला राष्ट्रभावनेची जोड दिली. आजच्या पिढीने त्याच परंपरेला नागरी कर्तव्याची जोड देणे आवश्यक आहे. गल्लीतील तरुणाने हातात झाडू घेतला, डॉक्टरांनी आरोग्यसेवेचा हात पुढे केला, वकिलांनी सामान्य नागरिकाला कायद्याचे बळ दिले, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख करून दिली आणि वर्गणीतील काही हिस्सा गरिबांच्या अश्रू पुसण्यासाठी खर्च झाला, तर सार्वजनिक गणेशोत्सवाचे नवे पर्व सुरू होईल.

गणेशोत्सवाची खरी उंची मंडपाच्या कळसात नसते; ती समाजाच्या विवेकाच्या उंचीत असते. गणरायासमोरचा खरा प्रसाद म्हणजे केवळ नैवेद्य नव्हे, तर कायद्याचा सन्मान, नागरिक कर्तव्याची जाणीव आणि दुर्बलांच्या पाठीशी उभे राहण्याची वृत्ती.

लोकमान्यांनी देवघरातील गणपतीला सार्वजनिक चौकात आणून स्वातंत्र्याची चेतना जागवली. आता विकसित भारताच्या पिढीने त्या सार्वजनिक चौकाला सुशासन, स्वच्छता, आरोग्य, कायदेविषयक जागरूकता आणि सामाजिक समतेचे केंद्र बनविले पाहिजे. तेव्हाच सार्वजनिक गणेशोत्सव हा केवळ उत्सव न राहता राष्ट्रनिर्मितीची लोकशाळा बनेल. ■■■

# आठ उच्च न्यायालयांत नवे नेतृत्व; न्यायव्यवस्थेला नवी दिशा?

देशातील आठ उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींच्या नियुक्त्यांनी न्यायव्यवस्थेतील नेतृत्वबदलाला वेग आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमच्या शिफारशींनंतर केंद्र सरकारने या नियुक्त्या जाहीर केल्या. त्यामुळे मुंबईपासून दिल्ली, राजस्थानपासून छत्तीसगडपर्यंत अनेक उच्च न्यायालयांना आता नवे नेतृत्व लाभणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे यांच्यावर कलकत्ता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती वल्लुरी कामेश्वर राव आता पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.

राजस्थान उच्च न्यायालयासाठी छत्तीसगडचे न्यायमूर्ती संजय कुमार अग्रवाल, छत्तीसगडसाठी ओडिशाचे न्यायमूर्ती कृष्ण राम महापात्रा आणि पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयासाठी न्यायमूर्ती अश्वनी कुमार मिश्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे बदल केवळ पदांवरील फेरबदल म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखाली न्यायालयीन प्रशासन, प्रलंबित खटल्यांचा निपटारा, न्यायालयीन पायाभूत सुविधा आणि न्यायप्रवेशाची कार्यक्षमता यांसारख्या अनेक महत्त्वाच्या बाबींना दिशा मिळते. त्यामुळे नव्या नेतृत्वाकडून अपेक्षा मोठ्या आहेत.




विशेषतः न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या खटल्यांचा प्रश्न गंभीर आहे. न्याय मिळण्यास होणारा विलंब हा अनेकदा न्याय नाकारण्याइतकाच वेदनादायक ठरतो. त्यामुळे नव्या मुख्य न्यायमूर्तींसमोर केवळ प्रशासकीय कारभार चालवण्याचे नव्हे, तर न्यायव्यवस्थेची गती आणि परिणामकारकता वाढवण्याचेही मोठे आव्हान आहे. मात्र, या नियुक्त्यांकडे पाहताना न्यायपालिकेचे स्वातंत्र्य आणि घटनात्मक समतोल यांचे भान कायम राहणे आवश्यक आहे. न्यायाधीशांच्या नियुक्तीची प्रक्रिया, कॉलेजियमच्या शिफारशी आणि केंद्र सरकारची भूमिका याबाबत देशात सातत्याने चर्चा होत असते. या पार्श्वभूमीवर प्रत्येक नियुक्ती पारदर्शकता, घटनात्मक मूल्ये आणि न्यायपालिकेवरील जनतेचा विश्वास अधिक बळकट करणारी ठरणे अपेक्षित आहे.

मुख्य न्यायमूर्ती बदलतात; पण जनतेची न्यायाबाबतची अपेक्षा बदलत नाही. नव्या नेतृत्वाची खरी कसोटी पदभार स्वीकारण्यात नव्हे, तर न्याय अधिक वेगवान, सुलभ आणि निष्पक्ष करण्यात आहे. ■■■

# कायद्याच्या माध्यमातून विकसित राष्ट्र घडविताना

## प्रशांत भूषण आणि जनहित याचिकेची अग्रणी चळवळ

**एखाद्या देशाचा विकसनशीलतेकडून विकसित राष्ट्राकडे होणारा प्रवास केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्न, पायाभूत सुविधा किंवा औद्योगिक उत्पादनाच्या आकडेवारीतून मोजता येत नाही. खरा विकास हा संस्थात्मक आणि संरचनात्मक असतो. तो कायद्याचे राज्य, सार्वजनिक संस्थांची सचोटी, प्रशासनातील पारदर्शकता आणि न्यायव्यवस्थेच्या समन्यायी कार्यपद्धतीवर उभा असतो. भारताला परिपक्व आणि अर्थपूर्ण लोकशाही म्हणून प्रस्थापित करायचे असेल, तर कायद्याच्या क्षेत्रातील धुरिणांनी विशेषत: नवोदित कायदापदवीधरांनी हे ओळखले पाहिजे की, वकिली हा केवळ व्यवसाय नसून राष्ट्रनिर्मितीचे प्रभावी साधन आहे.**

भारतीय संविधानाने वकिलांना दिलेली ही जबाबदारी सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांच्या कार्यापेक्षा अधिक प्रभावीपणे क्वचितच कोणी मांडली असेल. गेली चार दशके त्यांनी केलेल्या न्यायालयीन लढ्यांनी हे अधोरेखित केले आहे की, लोककल्याण, पारदर्शकता आणि सार्वजनिक उत्तरदायित्वासाठी दाखल होणारी जनहित याचिका (PIL) ही केवळ न्यायालयीन प्रक्रिया नसून लोकशाहीतील सार्वजनिक विश्वासाचे संरक्षण करणारी महत्त्वाची यंत्रणा आहे.

**✦ लोककल्याणापासून संस्थात्मक पारदर्शकतेपर्यंत**

भारतातील जनहित याचिकांचा प्रारंभीचा प्रवास सामाजिक आणि आर्थिक न्यायाभोवती केंद्रित होता. कच्च्या कैद्यांचे अधिकार, वेठबिगारीचे निर्मूलन, विस्थापितांचे पुनर्वसन अशा प्रश्नांना न्यायालयीन हस्तक्षेपातून वाचा मिळाली. मात्र, बदलत्या काळाबरोबर भ्रष्ट युती, नैसर्गिक साधनसंपत्तीचे अपारदर्शक वाटप, नियामक संस्थांवरील दबाव आणि सत्तेच्या गैरवापरासारखी आव्हानेही पुढे आली. या बदलत्या वास्तवात प्रशांत भूषण यांच्या न्यायालयीन लढ्यांनी जनहित याचिकेच्या व्याप्तीला नवे परिमाण दिले.



**ॲड. पल्लवी काळे**
मार्गदर्शक, 'डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज '

**✦ सार्वजनिक साधनसंपत्ती जनतेची**

२जी स्पेक्ट्रम आणि कोळसा खाण वाटप यांसारख्या महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये नैसर्गिक व सार्वजनिक साधनसंपत्ती ही जनतेची असून शासन तिचे केवळ विश्वस्त आहे, हा सार्वजनिक विश्वस्त तत्त्वाचा मुद्दा प्रभावीपणे मांडण्यात आला. या प्रकरणांतील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांनी प्रशासनाच्या अपारदर्शक अधिकारांना मर्यादा घातल्या आणि सार्वजनिक संसाधनांच्या वाटपात पारदर्शक, स्पर्धात्मक प्रक्रियेची गरज अधोरेखित केली. सार्वजनिक संपत्तीच्या व्यवस्थापनात 'सत्ता म्हणजे मालकी नव्हे; सत्ता म्हणजे विश्वस्तपद' हा विचार लोकशाहीच्या मुळाशी आहे.

**✦ मतदाराचा अधिकार आणि निवडणूक पारदर्शकता**

२०२४ मधील इलेक्टोरल बाँड्स योजनेला देण्यात आलेल्या घटनात्मक आव्हानानेही लोकशाहीतील पारदर्शकतेचा प्रश्न केंद्रस्थानी आणला. मतदाराला राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निधीची माहिती मिळण्याचा अधिकार हा मुक्त आणि अर्थपूर्ण मतदानाचा अविभाज्य भाग आहे, असा घटनात्मक युक्तिवाद करण्यात आला. कॉर्पोरेट निधी, राजकीय सत्ता आणि सार्वजनिक धोरण यांच्यातील संबंध जनतेपासून लपविला गेला, तर लोकशाहीची निवडणूक प्रक्रिया केवळ मतदानापुरती उरते. सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयाने मतदाराच्या माहितीच्या अधिकाराचे महत्त्व अधोरेखित केले.

**✦ न्यायव्यवस्थेलाही पारदर्शकतेचे बंधन**

कायद्याचे राज्य इतरांना सांगण्यापुरते मर्यादित राहू शकत नाही; त्याची सुरुवात स्वत:च्या संस्थांपासून झाली पाहिजे. भारताच्या सरन्यायाधीशांच्या कार्यालयाला माहितीच्या



अधिकाराच्या (RTI) कक्षेत आणण्याच्या लढ्यात न्यायव्यवस्थेतील पारदर्शकतेचा प्रश्न उपस्थित झाला. लोकशाहीच्या कोणत्याही स्तंभावर प्रश्न विचारला जाऊ नये, अशी भूमिका घटनात्मक लोकशाहीच्या मूलभूत भावनेशी विसंगत ठरते. अधिकार जितका मोठा, तितकी उत्तरदायित्वाची गरज अधिक—हे तत्त्व सर्व संस्थांना समानपणे लागू झाले पाहिजे.

**✦ नवोदित वकिलांसाठी तीन धडे**

आज कायद्याच्या क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या तरुण पदवीधरांसमोर कॉर्पोरेट क्षेत्र, आकर्षक मानधन आणि व्यावसायिक करिअरच्या अनेक संधी आहेत. त्या नाकारण्याचे कारण नाही. मात्र, न्यायव्यवस्थेचा सामाजिक चेहरा जिवंत ठेवण्यासाठी जनहिताच्या प्रश्नांवर लढणाऱ्या सक्षम वकिलांचीही तितकीच गरज आहे. प्रशांत भूषण यांच्या कार्यशैलीतून तरुण वकिलांना तीन महत्त्वाचे धडे मिळतात.

**✦ पहिला -** भावनेपेक्षा पुराव्याला महत्त्व. प्रभावी जनहित याचिका केवळ आरोपांवर उभी राहत नाही.

लेखापरीक्षण अहवाल, माहितीच्या अधिकारातून प्राप्त कागदपत्रे, प्रशासकीय निर्णय, निविदा प्रक्रिया, सरकारी आकडेवारी आणि अधिकृत नोंदी यांचा सखोल अभ्यास करून पुराव्यांची भक्कम साखळी तयार करावी लागते. न्यायालयीन लढा हा भावनिक उद्रेक नसून तथ्य, कायदा आणि घटनात्मक तत्त्वांचा शिस्तबद्ध प्रवास असतो.

**✦ दुसरा -** स्वायत्तता आणि स्वातंत्र्य. जनहिताच्या लढ्याला राजकीय किंवा कॉर्पोरेट प्रभावापासून मुक्त ठेवणे आवश्यक आहे. 'प्रो बोनो' म्हणजे विनामूल्य समाजहिताचे काम ही केवळ उदात्त कल्पना न राहता न्यायव्यवस्थेच्या सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग बनली पाहिजे. स्वतंत्र कायदेविषयक कक्ष, संस्था आणि संशोधनपर उपक्रमांच्या माध्यमातून तरुण वकील जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने काम करू शकतात.

**✦ तिसरा -** घटनात्मक धैर्य. व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या याचिकाकर्त्याला अनेकदा सत्तेचा रोष, सामाजिक दबाव किंवा न्यायालयीन संघर्षाचा सामना करावा लागतो. अशा वेळी वकिलाकडे केवळ कायद्याचे ज्ञान असून चालत नाही; त्याच्याकडे बौद्धिक धैर्य, नैतिक स्वायत्तता आणि संविधानावरील अढळ निष्ठा असणे आवश्यक आहे.

जनहित आणि घटनात्मक मूल्यांसाठी लढणे हा व्यावसायिक यशापासून दूर जाणारा मार्ग नाही. उलट, वकिलीच्या सनदेत स्वीकारलेल्या संविधानसंरक्षणाच्या शपथेचे ते सर्वोच्च प्रकटीकरण आहे. कायदा जेव्हा कागदावरील कलमांमधून बाहेर पडून सामान्य नागरिकाच्या प्रत्यक्ष जीवनातील हक्क बनतो आणि कार्यकारी सत्तेला संविधानाच्या चौकटीत उत्तरदायी ठेवतो, तेव्हाच विकसित राष्ट्राची खरी पायाभरणी होते.

आज भारत 'विकसित राष्ट्र' होण्याचे लक्ष्य ठेवत आहे. मात्र, विकसित राष्ट्राची व्याख्या केवळ महामार्ग, गगनचुंबी इमारती, डिजिटल अर्थव्यवस्था किंवा औद्योगिक गुंतवणुकीत शोधता येणार नाही. नागरिकाला न्याय मिळतो का, सार्वजनिक पैसा पारदर्शकपणे वापरला जातो का, संस्थांवर जनतेचा विश्वास आहे का आणि सत्तेला कायद्याच्या चौकटीत उत्तर द्यावे लागते का  या प्रश्नांची उत्तरेच राष्ट्राच्या विकासाची खरी कसोटी ठरतात. न्यायालयात पदार्पण करणाऱ्या प्रत्येक तरुण वकिलाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, सशक्त लोकशाही आणि विकसित भारताची उभारणी केवळ सरकारी धोरणांमधून होत नाही. ती संविधानाच्या मूल्यांवर अविचल निष्ठा ठेवून सत्तेला प्रश्न विचारणाऱ्या, दुर्बलांच्या हक्कांसाठी उभ्या राहणाऱ्या आणि जनहिताला न्यायालयीन आवाज देणाऱ्या निर्भीड वकिलांच्या माध्यमातूनही घडते. जनहित याचिका ही न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याची प्रक्रिया नसून लोकशाहीला तिच्या घटनात्मक आरशासमोर उभे करण्याचे सामर्थ्यवान माध्यम आहे.

---

# विवाह म्हणजे महिलेच्या स्वायत्ततेचा अंत नव्हे!

## वैवाहिक बलात्काराच्या प्रश्नाला घटनात्मक न्यायाची कसोटी

विवाह हा दोन व्यक्तींचा सहजीवनाचा संबंध आहे; तो स्त्रीच्या शरीरावर मिळालेला मालकी हक्क नव्हे. विवाहाच्या वेळी दिलेली संमती ही आयुष्यभरासाठी दिलेली परवानगी ठरू शकत नाही. पत्नीचा 'नाही' हा विवाहानंतरही 'नाही'च असतो. त्यामुळे वैवाहिक बलात्काराचा प्रश्न हा केवळ पती-पत्नीमधील खासगी वाद नसून स्त्रीची प्रतिष्ठा, शारीरिक स्वायत्तता, समानता आणि घटनात्मक न्याय यांचा प्रश्न आहे.



**संदीप बोरसे**
सहायक प्राध्यापक, डी.ई.एस.,
श्री. नवलमल फिरोदिया
विधी महाविद्यालय, पुणे

भारतीय समाजात विवाहाला मोठे सामाजिक महत्त्व आहे. मात्र विवाहामुळे स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व संपत नाही. ती विवाहापूर्वी स्वतंत्र नागरिक असते आणि विवाहानंतरही तितकीच स्वतंत्र राहते. 'पतीला पत्नीवर अधिकार आहे' किंवा 'पत्नीने पतीच्या इच्छेला नकार देऊ नये' या धारणा पितृसत्ताक मानसिकतेचे प्रतीक आहेत.

लैंगिक संबंधांमध्ये संमती ही मूलभूत बाब आहे. ती स्वेच्छेची आणि प्रत्येक वेळी स्वतंत्र असते. विवाहाच्या वेळी दिलेला होकार म्हणजे आयुष्यभरातील प्रत्येक लैंगिक संबंधाला दिलेली संमती नव्हे. त्यामुळे पत्नीने नकार दिल्यानंतरही तिच्यावर लैंगिक बळजबरी होत असेल, तर केवळ विवाहाचे नाते त्या कृतीला वैधता देऊ शकते का, हा मूलभूत प्रश्न आहे.

भारतीय न्याय संहितेतही प्रौढ विवाहित स्त्रीच्या संदर्भातील वैवाहिक बलात्काराचा अपवाद कायम आहे. त्यामुळे या अपवादाची घटनात्मक वैधता हा महत्त्वाचा प्रश्न ठरतो. संविधानातील कलम १४चे समानतेचे तत्त्व आणि कलम २१मधील जीवन, प्रतिष्ठा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार यांचा या चर्चेशी थेट संबंध आहे.

के. एस. पुट्टस्वामी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेच्या अधिकारात व्यक्तीचे शरीर, लैंगिकता आणि वैयक्तिक निवडींचाही समावेश असल्याचे स्पष्ट केले. जोसेफ शाइन प्रकरणाने पत्नी ही पतीची मालमत्ता नसल्याचे घटनात्मक तत्त्व अधोरेखित केले. तर इंडिपेंडंट थॉट प्रकरणात विवाहापेक्षा अल्पवयीन मुलीचे संरक्षण महत्त्वाचे मानण्यात आले. या निर्णयांतून एक व्यापक तत्त्व पुढे येते. विवाह हा मूलभूत अधिकारांपेक्षा मोठा असू शकत नाही.

वैवाहिक बलात्काराला गुन्हा मानल्यास कायद्याचा गैरवापर होईल, असा युक्तिवाद केला जातो. गैरवापराची शक्यता नाकारता येत नाही; मात्र त्यावर उपाय म्हणजे कायदेशीर संरक्षण नाकारणे नव्हे. निष्पक्ष तपास, पुराव्यांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन आणि आरोपीला न्याय्य सुनावणी ही त्याची उत्तरे आहेत.

खरा प्रश्न 'विवाह टिकवायचा की नाही' हा नाही; विवाह टिकवताना त्यातील व्यक्तीचे माणूसपण, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा टिकणार आहे का, हा आहे. विवाहसंस्थेचे संरक्षण म्हणजे हिंसेकडे डोळेझाक नव्हे. विवाहात प्रेम असू शकते, कर्तव्ये असू शकतात, अपेक्षा असू शकतात; मालकी हक्क मात्र असू शकत नाही. स्त्रीचे शरीर तिचेच आहे. तिची संमती तिचीच आहे. विवाहामुळे तिचे नागरिकत्व, प्रतिष्ठा किंवा स्वायत्तता संपत नाही.

विवाह नाते आहे; मालकी हक्क नाही. आणि विवाह टिकवायचा असेल, तर आधी त्या विवाहातील माणूस टिकवावा लागेल.

DEVELOPED NATIONS
डेवलप्ड नेशन्स लॉं न्यूज

# नागपूरच्या मलनिस्सारण प्रकल्पासाठी भूसंपादनाचा मार्ग मोकळा

## ‘आरक्षण संपले’चा विकासकाचा दावा सर्वोच्च न्यायालयानेही फेटाळला; वाढीव मोबदल्याचा हक्क मात्र कायम

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**नागपूर :** नागपूरमधील पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पांतर्गत मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र आणि पंपिंग स्टेशन उभारण्यासाठी करण्यात आलेल्या सुमारे १२.१२ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनाला सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्णयाला आव्हान देणारी विशेष अनुमती याचिका न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने फेटाळली. त्यामुळे भूसंपादनाची प्रक्रिया कायम राहणार असून महापालिकेच्या महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे.

मौजा चिखली (खुर्द) येथील संबंधित जमीन नागपूरच्या विकास आराखड्यात जलनिस्सारण व सांडपाणी विल्हेवाट योजनेसाठी आरक्षित करण्यात आली होती. हे आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम १२७ अन्वये संपुष्टात आल्याचा दावा ‘श्री गणेश बिल्डर्स’ने केला होता. मात्र, ७ ऑगस्ट रोजीच्या निकालात नागपूर खंडपीठाने विकासकाचा दावा फेटाळला होता.

उच्च न्यायालयाने विकासकाने दिलेल्या खरेदी नोटिशीतील मूलभूत त्रुटीवर बोट ठेवले. नोटिशीत नमूद केलेल्या भूखंडांच्या महसूल अभिलेखांमध्ये मालकी वेगवेगळ्या व्यक्ती किंवा संस्थांच्या नावावर असल्याचे आढळले. त्यामुळे प्रशासनाने संबंधितांकडून स्पष्टीकरण तसेच मालकी हक्काची कागदपत्रे मागितली होती. ही त्रुटी दूर करण्यात आली नाही. त्यानंतर तब्बल दशकभर विकासकाने नोटीस नाकारण्याच्या निर्णयाला आव्हानही दिले नाही.

विशेष म्हणजे, भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर विकासकाने त्यात सहभाग घेतला. नुकसानभरपाईसंदर्भात दावे सादर करण्याबरोबरच वाढीव मोबदल्याची मागणीही करण्यात आली. एकीकडे भूसंपादनाची प्रक्रिया सुरू असताना त्यात सहभागी होणे आणि दुसरीकडे ते कायदेशीरदृष्ट्या टिकू शकत नाही, असा दावा करणे परस्परविरोधी असल्याचे उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या या निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला. मात्र, विकासकाचा वाढीव नुकसानभरपाईचा दावा संपुष्टात आलेला नाही. योग्य प्राधिकरणासमोर कायद्यानुसार वाढीव मोबदल्यासाठी दावा करण्याची मुभा सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. त्यामुळे भूसंपादन वैध ठरले असले तरी मोबदल्याचा स्वतंत्र प्रश्न खुला राहणार आहे.

या निकालामुळे कलम १२७ च्या अंमलबजावणीबाबत महत्त्वाचा संदेश गेला आहे. जमीनमालकाने खरेदी नोटीस बजावली म्हणून विकास आराखड्यातील आरक्षण आपोआप संपुष्टात येत नाही. नोटीस कायदेशीरदृष्ट्या वैध आहे का, संबंधित प्राधिकरणाने त्यावर काय कार्यवाही केली आणि त्यानंतर पक्षकारांचे वर्तन काय राहिले, यालाही महत्त्व आहे. पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पांतर्गत प्रस्तावित मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र आणि पंपिंग स्टेशनमुळे नागपूरच्या विद्यमान सांडपाणी प्रक्रिया व्यवस्थेवरील ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन हा सार्वजनिक उपयोगाचा प्रकल्प असल्याचेही उच्च न्यायालयाने अधोरेखित केले होते. खासगी मालमत्तेचा हक्क आणि सार्वजनिक पायाभूत सुविधांची गरज यांच्यातील संघर्ष या प्रकरणातून पुन्हा समोर आला आहे. मात्र, सार्वजनिक प्रकल्पाच्या नावाखाली जमीनमालकाच्या मोबदल्याच्या हक्कावर गदा येत नाही, हेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. भूसंपादन कायम; आता लढाई केवळ योग्य मोबदल्यासाठी!

# मुलांना घराबाहेर काढण्याची वेळ का आली?

## ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानासाठी सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

ज्या हातांनी मुलांना धरून चालायला शिकवले, त्याच हातांना म्हातारपणी आधारासाठी कायद्याची काठी घ्यावी लागते, ही केवळ कौटुंबिक शोकांतिका नाही; ती समाजाच्या संस्कारांवर उमटलेली काळी रेघ आहे. आई-वडिलांनी आयुष्यभर कष्ट करून उभे केलेल्या घरातच त्यांना अपमान, मानसिक छळ आणि असुरक्षिततेला सामोरे जावे लागत असेल, तर अशा वेळी कायदा त्यांच्या बाजूने उभा राहणे अपरिहार्य ठरते. याच भूमिकेला सर्वोच्च न्यायालयाने अलीकडील महत्त्वपूर्ण निर्णयातून अधोरेखित केले आहे.



यशवंत लाखेपाटील
श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय, पुणे

‘पालक आणि ज्येष्ठ नागरिकांची देखभाल व कल्याण अधिनियम, २००७’ अंतर्गत स्थापन केलेल्या लवादाला ज्येष्ठ नागरिकांचे संरक्षण आणि देखभाल सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असल्यास मुलांना किंवा अन्य रहिवाशांना घरातून बेदखल करण्याचा अधिकार आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. मात्र, हा अधिकार अमर्याद नाही. केवळ कौटुंबिक मतभेद झाले म्हणून मुलाला घराबाहेर काढण्याचा तो सरसकट परवाना नाही; ज्येष्ठ नागरिकांचे जीवन, सन्मान, सुरक्षितता आणि शांततापूर्ण वास्तव्य यांचे संरक्षण आवश्यक आहे, तेव्हाच हा उपाय वापरता येतो.

लखनऊमधील रवि कांत गुप्ता यांच्या प्रकरणाने या प्रश्नाला निर्णायक वळण दिले. गुप्ता यांच्या ८१ वर्षीय आईला घरातील परिस्थितीमुळे वृद्धाश्रमात जावे लागले. त्यांनी २००७च्या कायद्याचा आधार घेत प्रशासनाकडे आपल्या मुलाला घरातून बेदखल करण्याची मागणी केली. उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी परिस्थितीची पाहणी करून मुलाला घर रिकामे करण्याचा आदेश दिला. जिल्हाधिकाऱ्यांनीही तो आदेश कायम ठेवला. मात्र, अलाहाबाद उच्च न्यायालयाने या कायद्यात बेदखलीचा स्पष्ट अधिकार नसल्याचे सांगत हे आदेश रद्द केले. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि तेथे उच्च न्यायालयाचा निर्णय बाजूला ठेवण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, कायद्याने लवादाला एखादे अधिकारक्षेत्र दिले असेल, तर त्या अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक आनुषंगिक अधिकारही त्यात अंतर्भूत असतात. २००७च्या कायद्याचा उद्देश केवळ ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक मदत मिळवून देणे नाही; त्यांचे जीवन, मालमत्ता, सुरक्षितता आणि सन्मानाचे संरक्षण करणे हा त्यामागचा व्यापक हेतू आहे. त्यामुळे परिस्थितीची गरज असेल तर बेदखलीचा आदेश हा संरक्षणात्मक उपाय ठरू शकतो. या निर्णयामागे भारतीय संविधानातील कलम २१ आणि कलम ४१ यांची मूल्यदृष्टीही महत्त्वाची आहे. जगण्याचा अधिकार म्हणजे केवळ श्वास घेण्याचा अधिकार नाही; तो सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. वृद्धापकाळात दुर्बल झालेल्या व्यक्तीला घरातच असुरक्षित, अपमानित किंवा भयभीत करून ठेवणे हे सभ्य समाजाचे लक्षण असू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयानेही ज्येष्ठांच्या सन्मान, सुरक्षितता आणि प्रतिष्ठेला सामाजिक न्यायाच्या केंद्रस्थानी ठेवले आहे. या निर्णयाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ‘आई-वडिलांच्या मालमत्तेवर मुलांचा जन्मसिद्ध हक्क असतो’ या सरसकट गैरसमजाला बसलेला धक्का. विशेषतः पालकांच्या स्वकष्टार्जित मालमत्तेबाबत मुलांना अनिर्बंध मालकीचा अधिकार गृहीत धरता येत नाही. पालकांच्या शांततापूर्ण आणि सन्मानपूर्वक जगण्याला मुलांच्या वर्तनामुळे बाधा येत असेल, तर कायदेशीर संरक्षणाचा मार्ग उपलब्ध आहे. परंतु या निर्णयाकडे ‘मुलांना घराबाहेर काढण्याचा मोकळा परवाना’ म्हणून पाहणेही तितकेच चुकीचे ठरेल. प्रत्येक घरात मतभेद असतात. पिढ्यांमध्ये विचारांचा संघर्षही असतो. मात्र, मतभेद आणि छळ यात फरक आहे. बेदखलीचा उपाय हा ज्येष्ठ नागरिकांच्या देखभाल व संरक्षणाशी संबंधित असला पाहिजे. संबंधित प्राधिकरणाने प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती, नातेसंबंध, मालमत्तेचे स्वरूप आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न तपासूनच निर्णय घ्यावा. अलीकडील न्यायालयीन व्याख्याही या अधिकाराला ‘blanket’ किंवा अमर्याद अधिकार मानत नाही. आजची खरी चिंता मात्र कायद्यापेक्षा मोठी आहे. ज्या आई-वडिलांनी मुलांच्या शिक्षणासाठी स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवल्या, घरासाठी आयुष्य खर्च केले, आजारपणात मुलांना सांभाळले आणि स्वतःच्या वृद्धापकाळाची चिंता न करता पुढची पिढी उभी केली, त्यांनाच आयुष्याच्या संध्याकाळी मुलांपासून संरक्षण मागावे लागते, ही समाजाच्या आत्मपरीक्षणाची वेळ आहे. हेल्पएज इंडियाच्या अहवालात ज्येष्ठ नागरिकांना होणाऱ्या गैरवर्तनात मुलांची भूमिका चिंताजनक असल्याचे नमूद केले गेले आहे. त्याहून गंभीर बाब म्हणजे ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांसाठी असलेल्या २००७च्या कायद्याची माहितीच अनेकांना नसते. कायदा पुस्तकात राहिला आणि घरात माणुसकी हरवली, तर कायद्याची ताकदही अपुरी पडते. २१व्या शतकात आपण जगभरातील लोकांशी एका क्षणात संवाद साधतो; पण अनेक घरांमध्ये आई-वडिलांशी दोन प्रेमाचे शब्द बोलण्यासाठी वेळ उरलेला नाही. तंत्रज्ञानाने अंतर कमी केले; माणुसकीने मात्र काही घरांत अंतर वाढवले. *‘वसुधैव कुटुंबकम्’*चा वारसा सांगणाऱ्या समाजात वृद्ध आई-वडिलांना स्वतःच्या घरातच परके होण्याची वेळ येत असेल, तर प्रगतीच्या आपल्या व्याख्येवरच प्रश्नचिन्ह उभे राहते. म्हातारपण ही शिक्षा नाही; ती आयुष्यभराच्या योगदानाची संध्याकाळ आहे. त्या संध्याकाळी पैशापेक्षा सन्मान, मालमत्तेपेक्षा सुरक्षितता आणि कायद्यापेक्षा मायेची गरज असते. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय ज्येष्ठ नागरिकांना कायदेशीर आधार देतो; पण खरा प्रश्न न्यायालयाने नाही, आपल्या घरांनी सोडवायचा आहे. आई-वडिलांना घराबाहेर काढण्यापूर्वी मुलांनी विचार करावा; कारण उद्याचे म्हातारपण कोणाचेही चुकत नाही.

# मोबाईलच्या विळख्यातून ‘अनस्टॉपेबल लर्नर’चा मार्ग

## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन



**मुंबई :** मोबाईल आणि सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे विचलित होणाऱ्या युवा पिढीला तंत्रज्ञानाचा विधायक वापर, कौशल्यविकास आणि सातत्यपूर्ण शिक्षणाचा मार्ग दाखविणाऱ्या ‘द अनस्टॉपेबल लर्नर’ या प्रेरणादायी पुस्तकाचे प्रकाशन विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते विधान भवनातील शासकीय दालनात करण्यात आले.

पुस्तकाचे लेखक ॲड. रमेश बनसोडे असून, मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता त्यातून ज्ञान, कौशल्य आणि करिअरच्या संधी कशा निर्माण करता येतील, यावर पुस्तकात भर देण्यात आला आहे. रिल्स आणि सोशल मीडियाच्या आहारी जाण्याऐवजी ई-लर्निंग, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वतःला अद्ययावत करण्याचा संदेश पुस्तकातून देण्यात आला आहे.

मोबाईलचा वाढता वापर हा आजच्या पिढीसमोरील गंभीर सामाजिक प्रश्न बनला आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटांत मोबाईलचा वापर वाढला असून, तरुणांमध्ये सोशल मीडिया आणि रिल्सचे वाढते आकर्षण चिंतेचा विषय ठरत आहे. या पार्श्वभूमीवर मोबाईल ‘शाप’ न ठरता ‘संधी’ कसा ठरू शकतो, याची दिशा पुस्तकातून देण्यात आली आहे.

दहा प्रकरणांमध्ये मांडलेला हा प्रवास नकारात्मक विचारांपासून सकारात्मक ध्येयाकडे नेणारा आहे. संकटे, संघर्ष आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ध्येय गाठण्यासाठी आवश्यक असलेली मानसिकता, सातत्य आणि शिकण्याची वृत्ती यांचे महत्त्व लेखकाने स्वतःच्या अनुभवांच्या आधारे मांडले आहे. त्यामुळे पुस्तक केवळ उपदेश न करता अनुभवातून शिकण्याची दिशा देणारे ठरते.

दरम्यान, लेखक ॲड. रमेश बनसोडे यांनी कोरोना काळातील लॉकडाऊनचा शिक्षणासाठी प्रभावी उपयोग केला. परदेशातील विविध विद्यापीठांमधून त्यांनी ७० शॉर्ट टर्म अभ्यासक्रम पूर्ण करून प्रमाणपत्रे मिळवली. त्यांच्या या कामगिरीची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आणि लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली असून, त्यांच्या नावावर पाच जागतिक विक्रम असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

प्रकाशन सोहळ्यास ॲड. अभिजीत चव्हाण, ॲड. डोंगरे, किशोर वाघमारे, सुनील वाघमारे आणि विनोद साळवे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी पुस्तकाचे कौतुक करून ॲड. रमेश बनसोडे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आवाज चढवणेही अवमानाच्या कक्षेत; कायदा सचिवांना उच्च न्यायालयाची नोटीस

## फास्ट ट्रॅक न्यायालयांच्या १७९ पदांवरून प्रशासनावर आरोप; घुमारे यांच्या आक्रमक वर्तनावर खंडपीठ नाराज

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**मुंबई :** खुल्या न्यायालयात आवाज चढवून आणि आक्रमकपणे बोलत न्यायालयाच्या प्रशासनावरच आरोप केल्याप्रकरणी महाराष्ट्र सरकारच्या विधी व न्याय विभागाचे सचिव तथा वरिष्ठ विधी सल्लागार दिलीप एस. घुमारे यांच्याविरोधात न्यायालयाचा अवमानाची नोटीस बजावण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. न्यायालयाच्या प्रतिष्ठेला आणि अधिकाराला धक्का पोहोचविणारे त्यांचे वर्तन माफ करण्याजोगे नसल्याचे स्पष्ट करत न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने कठोर नाराजी व्यक्त केली.




फास्ट ट्रॅक न्यायालयांसाठी निर्माण करण्यात आलेल्या १७९ पदांच्या नियुक्तीशी संबंधित जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान हा प्रकार घडला. ‘विहार शिवाजीराव दुर्वे विरुद्ध महाराष्ट्र सरकार’ या प्रकरणाच्या अंतरिम अर्जावर सुनावणी सुरू असताना २७ ऑगस्ट २०२६ रोजी दाखल करण्यात आलेल्या अतिरिक्त प्रतिज्ञापत्रात १७९ नवीन पदे निर्माण केल्याचा उल्लेख करण्यात आला होता. मात्र, त्याबाबत अतिरिक्त सरकारी वकिलांकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने न्यायालयाने घुमारे यांच्याकडे विचारणा केली.

न्यायालयाच्या प्रश्नाला थेट उत्तर देण्याऐवजी घुमारे यांनी कथितरीत्या आवाज चढवून आणि आक्रमकपणे भूमिका मांडली. १७९ पदे भरली न जाण्यासाठी उच्च न्यायालयाचे प्रशासनच जबाबदार असल्याचे त्यांनी सांगितल्याचे न्यायालयीन निरीक्षणातून स्पष्ट झाले. खुल्या न्यायालयात आणि सर्वांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रकाराची खंडपीठाने गंभीर दखल घेतली.

घुमारे यांचा ‘अनावश्यक उद्रेक आणि आक्रमक वर्तन’ हे न्यायालयाला बदनाम करणारे तसेच न्यायालयाचा अधिकार कमी करण्याचा प्रयत्न असल्याचे खंडपीठाने नमूद केले. त्यामुळे न्यायालयाचा अवमान घडल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट दिसत असल्याचे न्यायालयाने म्हटले. विधी व न्याय विभागाचे सचिव आणि वरिष्ठ विधी सल्लागार असलेल्या व्यक्तीकडून अशा वर्तनाची अपेक्षा नसल्याचेही खंडपीठाने स्पष्ट केले.

सुनावणीदरम्यान महाधिवक्त्यांनी घुमारे यांची माफी स्वीकारण्याची विनंती केली. मात्र, खुल्या न्यायालयात न्यायिक अधिकाऱ्याच्या उपस्थितीत घडलेल्या गंभीर प्रकाराकडे केवळ माफी मागितल्यामुळे दुर्लक्ष करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. चुकीचे वर्तन करून नंतर माफी मागितल्यास कारवाईतून सुटका मिळू शकते, असा चुकीचा संदेश जाऊ नये, अशी भूमिकाही न्यायालयाने घेतली.

मतभेद असणे किंवा सरकारी बाजू मांडताना अडचण निर्माण होणे यामुळे न्यायालयाचा अनादर करण्याचा अधिकार मिळत नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले. न्यायालयीन कामकाजाचे पावित्र्य आणि शिस्त राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असून न्यायिक अधिकारी किंवा न्यायालयीन प्रक्रियेशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांवर ही जबाबदारी अधिकच गंभीर असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

या पार्श्वभूमीवर रजिस्ट्रार (न्यायिक)-II यांना दिलीप एस. घुमारे यांना नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या अपील शाखेच्या नियमांनुसार ही नोटीस बजावण्यात येणार असून, त्यांच्याविरोधात न्यायालयाचा अवमानाची कारवाई का सुरू करू नये, याचे स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.

या प्रकरणामुळे न्यायालयीन कामकाजातील शिस्त, सरकारी अधिकाऱ्यांचे न्यायालयाप्रती उत्तरदायित्व आणि न्यायालयाच्या अधिकाराचा आदर या मुद्द्यांवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. न्यायालयात युक्तिवादाला जागा आहे; आक्रमकतेला नाही. हा संदेशच या कारवाईतून अधोरेखित झाला आहे.

---

# गाऊनपेक्षा विवेक मोठा

## फली एस. नरिमन सर : नव्या वकिलांनी काय शिकावे?

कायद्याची पदवी मिळाल्यानंतर वकिली सुरू होते; मात्र चांगला वकील घडण्यासाठी अनेक वर्षांचा अभ्यास, निरीक्षण आणि अनुभव आवश्यक असतो. कायदा वाचता येणे पुरेसे नसते. न्यायालयात कोणता मुद्दा मांडायचा, कोणता टाळायचा, न्यायाधीशांच्या प्रश्नाला नेमके उत्तर कसे द्यायचे आणि प्रसंगी सत्तेच्या विरोधातही कायद्याची बाजू कशी मांडायची, हे वकिलाला शिकावे लागते. फली एस. नरिमन सर यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांच्या कृतीतून मिळतात. त्यांचा खरा वारसा केवळ गाजलेल्या युक्तिवादांमध्ये नाही; तो विवेक, संयम आणि नैतिक धैर्यात आहे.

१९५० मध्ये मुंबई उच्च न्यायालयात सनद मिळाल्यानंतर नरिमन सर यांनी सर जमशेदजी कांगा यांच्या मार्गदर्शनाखाली वकिलीला सुरुवात केली. सुरुवातीची अनेक वर्षे त्यांनी शिकण्यात घालवली. ज्येष्ठ वकिलांचे युक्तिवाद ते शांतपणे ऐकत. कायद्याची पुस्तके वारंवार वाचली जात. महत्त्वाच्या निकालांच्या नोंदी केल्या जात. न्यायालयीन कामकाज कसे चालते, न्यायाधीश कोणते प्रश्न विचारतात आणि त्या प्रश्नांना प्रभावीपणे कसे सामोरे जायचे, याचे त्यांनी बारकाईने निरीक्षण केले. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीचा पहिला धडा स्पष्ट होता. आधी ऐका, मग बोला.



ॲड. विशाल विजयराव काळे
मार्गदर्शक, डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

न्यायालयात अधिक बोलणारा वकील नेहमीच प्रभावी ठरत नाही. नेमका मुद्दा मांडणारा वकील मात्र न्यायालयाचे लक्ष वेधून घेतो. नरिमन सर यांची शैली याच तत्त्वावर आधारलेली होती. ते मुद्दा अनावश्यकपणे लांबवत नसत. प्रश्न कठीण असला तर विचार करून उत्तर देत. एखाद्या प्रश्नाचे उत्तर माहीत नसेल, तर ते लपवण्याचा प्रयत्न करीत नसत. त्यातून नव्या वकिलांसाठी एक महत्त्वाचा संदेश मिळतो. न्यायालयात आवाजापेक्षा तयारी प्रभावी ठरते.

ब्रीफमधील प्रत्येक मुद्दा न्यायालयासमोर मांडणे आवश्यक नसते. कोणता मुद्दा निर्णायक आहे, कोणता सोडून द्यायचा आणि कोणत्या प्रश्नावर ठाम राहायचे, याचा विवेक वकिलाकडे असला पाहिजे. चांगल्या युक्तिवादासाठी कायद्याचे ज्ञान जितके आवश्यक आहे, तितकीच स्वतःवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता महत्त्वाची आहे.

नरिमन सर यांच्या कारकिर्दीतील १९७५ सालचा प्रसंग नैतिक धैर्याचा आदर्श ठरतो. देशात आणीबाणी लागू झाल्यानंतर ते अतिरिक्त सॉलिसिटर जनरल होते. त्या निर्णयाशी असहमती दर्शवत त्यांनी पदाचा राजीनामा दिला. सरकारी पद, प्रतिष्ठा आणि अधिकार यांपेक्षा त्यांनी आपल्या विवेकाला प्राधान्य दिले. वकिलाची अंतिम निष्ठा सत्तेशी नसून संविधान आणि कायद्याशी असली पाहिजे, हा संदेश त्यांच्या भूमिकेतून स्पष्ट होतो.

न्यायपालिकेच्या स्वायत्ततेबाबतही नरिमन सर यांनी सातत्याने चिकित्सक भूमिका घेतली. ‘सेकंड जजेस केस’मध्ये न्यायाधीशांच्या नियुक्तीतील न्यायपालिकेच्या भूमिकेचे त्यांनी समर्थन केले. पुढे कॉलेजियम पद्धतीतील काही त्रुटींवरही त्यांनी खुलेपणाने मत व्यक्त केले. स्वतःची पूर्वीची भूमिका कायम योग्यच आहे, असा आग्रह त्यांनी धरला नाही. आपल्या विचारांचीही चिकित्सा करण्याची तयारी हे बौद्धिक प्रामाणिकपणाचे लक्षण आहे.

आज कायदे, न्यायनिर्णय आणि संदर्भ एका क्लिकवर उपलब्ध आहेत. माहिती मिळवणे सोपे झाले असले तरी तिचा योग्य वापर करण्यासाठी विवेक, अभ्यास आणि न्यायालयीन शिस्त आवश्यक आहे. न्यायालय काय विचारत आहे, त्या प्रश्नामागील कायदेशीर मुद्दा कोणता आहे आणि कोणत्या क्षणी कोणता युक्तिवाद मांडणे आवश्यक आहे, हे समजणे हीच खरी वकिलीची कसोटी आहे.

म्हणून नव्या वकिलांनी नरिमन सर यांच्याकडून केवळ गाजलेली प्रकरणे शिकू नयेत. त्यांनी त्यांची तयारी, संयम, स्पष्टता, प्रामाणिकपणा आणि नैतिक धैर्य आत्मसात करावे. न्यायालयाचा गाऊन परिधान करणे सोपे आहे; त्या गाऊनला प्रतिष्ठा मिळवून देणे कठीण आहे. त्यासाठी सातत्याने अभ्यास करावा लागतो, स्वतःच्या भूमिकेची चिकित्सा करावी लागते आणि योग्य वेळी योग्य बाजू घेण्याचे धैर्य दाखवावे लागते. फली एस. नरिमन सर यांच्या स्मृतीला हीच खरी आदरांजली ठरेल. कारण चांगला वकील कायदा जाणतो; श्रेष्ठ वकील मात्र कायद्यामागचा न्याय ओळखतो.

---

# नऊ लाखांची पोटगी थकवली; पतीचा बचावाचा हक्क रद्द



डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** न्यायालयाने दरमहा पोटगी देण्याचा आदेश दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्याला पुणे न्यायालयाने दणका दिला. सुमारे नऊ लाख रुपयांची अंतरिम पोटगी थकविल्याने पतीचा संबंधित प्रकरणातील बचावाचा हक्क रद्द करण्यात आला. न्यायालयीन आदेशाचे पालन न केल्यास त्याचे गंभीर कायदेशीर परिणाम भोगावे लागू शकतात, असा स्पष्ट संदेश या आदेशातून देण्यात आला आहे.

पत्नीच्या अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची व्यवस्था व्हावी, तसेच तिच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात, यासाठी न्यायालयाने १० नोव्हेंबर २०२५ रोजी पतीला दरमहा २५ हजार रुपये अंतरिम पोटगी देण्याचा आदेश दिला होता. ही पोटगी २० जून २०२३पासून प्रकरणाचा अंतिम निकाल होईपर्यंत देण्याचे निर्देश होते. संबंधित पती हा सरकारी कर्मचारी असून, त्याच्या डिसेंबर २०२४च्या वेतनपत्रकानुसार त्याचे मासिक वेतन ६१ हजार ८३० रुपये आहे.

> “न्यायालयाच्या आदेशाची जाणीव असूनही त्याचे पालन टाळल्यास केवळ थकबाकीच्या वसुलीपुरता विषय राहत नाही. अशा उल्लंघनाचा पक्षकाराच्या बचावाच्या हक्कावरही परिणाम होऊ शकतो.
> -ॲड. प्रसाद निकम, पत्नीचे वकील

मात्र, न्यायालयाचा स्पष्ट आदेश असतानाही पतीने पोटगीची नियमित रक्कम जमा केली नाही. त्यामुळे कालांतराने पोटगीची थकबाकी सुमारे नऊ लाख रुपयांपर्यंत पोहोचली. न्यायालयाने आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याने पत्नीने अखेर न्यायालयात धाव घेतली.

पत्नीच्या वतीने ॲड. प्रसाद विराज निकम आणि ॲड. मन्सूर तांबोळी यांनी अर्ज दाखल करून पतीचा बचावाचा हक्क रद्द करण्याची मागणी केली. न्यायालयाच्या आदेशाची पतीला पूर्ण जाणीव होती. त्याचे पालन करण्याची आर्थिक क्षमता असूनही त्याने जाणीवपूर्वक आदेशाचे पालन केले नाही, असा युक्तिवाद पत्नीच्या वकिलांनी केला. न्यायालयीन आदेशाचे सातत्याने उल्लंघन करणाऱ्या पक्षकाराला त्याच प्रकरणात बचावाची संधी देणे योग्य ठरणार नाही, असा मुद्दाही पत्नीच्या वकिलांनी मांडला. पोटगीचा आदेश हा केवळ औपचारिक निर्देश नसून, त्याची अंमलबजावणी करणे संबंधित पक्षकारावर बंधनकारक आहे. आदेशाचे उल्लंघन करून न्यायालयीन प्रक्रियेचा अवमान करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम संबंधित पक्षकाराच्या हक्कांवर होऊ शकतो, असेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

# महिला वकिलांच्या घरावर मध्यरात्री धाड?

## मुंबई उच्च न्यायालयाकडून राज्य, सीबीआय आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना नोटीस

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** मध्यरात्री मोठ्या पोलिस फौजफाट्यासह घरात प्रवेश करून २४ जणांना ताब्यात घेणे, मारहाण करणे आणि मौल्यवान वस्तू तसेच कायदेशीर कागदपत्रे घेऊन जाण्याचा आरोप करणाऱ्या पुण्यातील दोन महिला वकिलांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. किर्ती आहुजा आणि कनिका आहुजा यांच्या याचिकेची दखल घेत न्यायालयाने राज्य सरकार, केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि पुणे पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे.

याचिकेनुसार, १७ जून २०२६ रोजी पहाटे सुमारे १.४० वाजता जवळपास २०० पोलिस कर्मचारी निवासी ठिकाणी दाखल झाले. त्यापैकी काही जण साध्या वेशात होते, असा याचिकाकर्त्यांचा दावा आहे. या कारवाईदरम्यान वृद्ध महिला आणि एका लहान बाळासह २४ जणांना ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. कनिका आहुजा यांनी मारहाण करून दुखापत केल्याचाही दावा केला आहे.



पोलिसांनी कारवाईदरम्यान सीसीटीव्ही यंत्रणा बंद केली तसेच रोख रक्कम, मौल्यवान वस्तू आणि मूळ कायदेशीर कागदपत्रे घेऊन गेल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. या कारवाईच्या कायदेशीर आधारावरही याचिकाकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.

याचिकेतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एफआयआरच्या नोंदणीची वेळ. पोलिसांनी नंतर एफआयआरचा आधार घेतला असला, तरी संबंधित पोलिस ठाण्याच्या नोंदीनुसार एफआयआर पहाटे ४.१२ वाजता नोंदविण्यात आला. त्याआधीच ताब्यात घेण्याची कारवाई झाल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र न्यायालयीन चौकशी किंवा सीबीआयमार्फत तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याचिकेत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत व्यक्तीच्या जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या अधिकाराचाही आधार घेण्यात आला आहे.

पोलिसांकडून अटक, झडती किंवा ताब्यात घेण्याची कारवाई कायद्याने निर्धारित प्रक्रियेनुसारच होणे अपेक्षित आहे. मात्र, संबंधित कारवाई कायदेशीर होती की नाही, हे उपलब्ध पुरावे आणि पोलिसांनी दाखविलेल्या कायदेशीर अधिकाराच्या आधारे न्यायालय ठरविणार आहे.

न्यायमूर्ती सारंग व्ही. कोतवाल आणि न्यायमूर्ती रंजितसिंहा आर. भोसले यांच्या खंडपीठाने राज्य सरकारसह संबंधितांना नोटीस बजावली आहे. पोलिसांविरुद्ध करण्यात आलेले आरोप अद्याप सिद्ध झालेले नाहीत आणि ते याचिकाकर्त्यांचे दावे आहेत. स्वतंत्र तपासाची मागणी मान्य करायची की अन्य कोणता दिलासा द्यायचा, याबाबत पुढील सुनावणीत न्यायालय निर्णय घेणार आहे.

या प्रकरणामुळे पोलिसांच्या कारवाईतील पारदर्शकता, नागरिकांचे व्यक्तिगत स्वातंत्र्य, कोठडीतील सुरक्षितता आणि वकिलांच्या कायदेशीर कामाच्या संरक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# मॅजिस्ट्रेटला नोटीस काढण्याची हिंमत कशी झाली?

## विद्यार्थ्यावरील कारवाईने सरन्यायाधीश संतप्त; सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्टीकरण मागवणार

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**नवी दिल्ली :** विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करू नये, असा सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट आदेश असतानाही आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्याला नोटीस बजावल्याने सर्वोच्च न्यायालयाने ग्रेटर नोएडाच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याला चांगलेच सुनावले. "मॅजिस्ट्रेटची नोटीस काढण्याची हिंमत कशी झाली?" असा संतप्त सवाल सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केला. संबंधित अधिकाऱ्याकडून स्पष्टीकरण मागवून प्रकरणातील कागदपत्रे न्यायालयीन रेकॉर्डवर घेण्याचे निर्देश खंडपीठाने दिले.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या (CJP) आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवर कोणतीही दंडात्मक कारवाई करू नये, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच दिला होता. तरीही गौतम बुद्ध विद्यापीठातील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी अक्षत त्रिपाठी याला ग्रेटर नोएडाच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याने नोटीस बजावली.

या नोटिशीद्वारे शांतता भंग होऊ नये यासाठी पाच लाख रुपयांचा वैयक्तिक बाँड का भरू नये, अशी विचारणा करण्यात आली होती. पोलिसांच्या अहवालाच्या आधारे भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (BNSS) कलम १२६ आणि १३५ अंतर्गत ४ सप्टेंबरला ही नोटीस बजावण्यात आली होती. विद्यार्थ्याने आंदोलनात शांततापूर्ण सहभाग घेतल्याचे सांगत पोलिसांचे आरोप फेटाळले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच CJP आंदोलनाशी संबंधित विद्यार्थ्यांवरील प्रकरणे रद्द करून त्यांच्याविरोधात दंडात्मक किंवा प्रतिबंधात्मक कारवाई करू नये, असे स्पष्ट केले होते. त्यामुळे प्रशासनाकडून बजावण्यात आलेल्या नोटिशीवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. "सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करण्याचा अधिकार कोणत्याही मॅजिस्ट्रेटला नाही," असा स्पष्ट संदेश खंडपीठाने दिला.

नोटीस नंतर मागे घेण्यात आली असली तरी केवळ नोटीस मागे घेतल्याने प्रकरण संपलेले नाही, अशी न्यायालयाची भूमिका दिसून आली. संबंधित कागदपत्रे रेकॉर्डवर घेऊन अधिकाऱ्याकडून स्पष्टीकरण मागवले जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशापेक्षा प्रशासनाची कारवाई मोठी नाही, हेच या सुनावणीतून अधोरेखित झाले.

# ILS लॉ कॉलेजला विद्यार्थ्याचे १.०४ लाख परत करण्याचा आदेश

डेवलप्ड नेशन्स
developednationslaw@gmail.com

**पुणे :** अतिरिक्त शुल्कापोटी विद्यार्थ्याकडून घेतलेली १ लाख ४ हजार ८६३ रुपयांची रक्कम सहा टक्के वार्षिक व्याजासह परत करण्याचे आदेश महाराष्ट्र सरकारने इंडियन लॉ सोसायटीच्या (ILS) लॉ कॉलेजला दिले आहेत. मयूर सुहास गरुड या माजी विद्यार्थ्याशी संबंधित शुल्कविषयक वादावर फेरविचार केल्यानंतर सरकारने हा आदेश दिला आहे.

'इतर शुल्क' तसेच 'इतर शुल्काव्यतिरिक्त' अशा शीर्षकांखाली संबंधित शैक्षणिक वर्षांत आकारण्यात आलेल्या रकमेवरून हा वाद निर्माण झाला होता. या शुल्कासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१(७)नुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची आवश्यक पूर्वमान्यता महाविद्यालयाने घेतली नसल्याचे सरकारने नमूद केले आहे. महाविद्यालयाने शुल्काला 'मानीव मान्यता' (deemed approval) असल्याचा दावा केला होता. मात्र, अशा प्रकारच्या शुल्कासाठी संबंधित कायद्यात मानीव मान्यतेची तरतूद नसल्याचे स्पष्ट करत सरकारने हा दावा फेटाळला. संबंधित शैक्षणिक वर्षांसाठी विद्यापीठाच्या शुल्क निश्चिती समितीने नंतर निश्चित केलेल्या रकमेपेक्षा विद्यार्थ्याकडून आकारलेले शुल्क अधिक असल्याचेही सरकारच्या आदेशात नमूद आहे. मयूर गरुड यांनी माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांच्या आधारे संबंधित प्राधिकरणांकडे तक्रार केली होती. त्यानंतर हा विषय मुंबई उच्च न्यायालयात गेला. न्यायालयाने या शुल्कविषयक वादाच्या गुणवत्तेवर अंतिम निर्णय देण्याऐवजी राज्य सरकारला प्रकरणाचा फेरविचार करण्याची संधी दिली होती. संबंधित पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सरकारने हा निर्णय दिला. शुल्क आकारण्याचा अधिकार हा केवळ संस्थेच्या निर्णयावर अवलंबून नसून संबंधित कायदा आणि विद्यापीठाच्या नियमांशी तो सुसंगत असणे आवश्यक आहे, हा या निर्णयाचा महत्त्वाचा मुद्दा आहे. आवश्यक वैधानिक पूर्वमान्यता नसताना आकारलेले शुल्क केवळ अनेक वर्षे वसूल झाले म्हणून आपोआप वैध ठरत नाही, अशी सरकारची भूमिका आहे. या निर्णयामुळे याच पद्धतीने शुल्क भरलेल्या इतर विद्यार्थ्यांनाही परताव्याची मागणी करण्याचा मुद्दा पुढे आला आहे. मात्र, एका विद्यार्थ्याला परतावा देण्याच्या आदेशामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला आपोआप समान परतावा मिळेल, असे मानता येणार नाही. संबंधित शैक्षणिक वर्ष, प्रत्यक्ष भरलेले शुल्क आणि त्या काळातील लागू नियम यांचा स्वतंत्र विचार करावा लागेल.

# मल्ल्या भारतात येईपर्यंत न्यायालयीन दार बंद!

## फरार आर्थिक गुन्हेगाराच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाचा स्पष्ट इशारा

**मुंबई :** फरार उद्योगपती विजय मल्ल्या भारतात परतत नाही, तोपर्यंत त्याच्या याचिकेवर सुनावणी घेणार नाही, असा स्पष्ट इशारा मुंबई उच्च न्यायालयाने दिला. भारताबाहेर राहून भारतीय न्यायालयाकडून दिलासा मागण्याच्या मल्ल्याच्या भूमिकेवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

मल्ल्याने स्वतःला 'फरार आर्थिक गुन्हेगार' घोषित करण्याच्या कारवाईला तसेच फरार आर्थिक गुन्हेगार कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले आहे. या याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने मल्ल्याला भारतात परतण्याची तयारी आहे की नाही, हे स्पष्ट करण्याचे निर्देश दिले.

मल्ल्या २०१६ पासून ब्रिटनमध्ये आहे. त्याच्याविरुद्ध भारतात आर्थिक गैरव्यवहार आणि फसवणुकीशी संबंधित प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे न जाता केवळ कायदेशीर दिलासा मागण्याचा प्रयत्न कितपत ग्राह्य धरता येईल, हा मुद्दा सुनावणीत केंद्रस्थानी राहिला.

न्यायालयाचा संदेश स्पष्ट आहे. न्यायालयीन संरक्षण हवे असेल तर न्यायालयीन प्रक्रियेलाही सामोरे जावे लागेल. देश सोडून गेलेल्या आर्थिक गुन्हेगारांना कायद्याच्या प्रक्रियेपासून दूर राहून न्यायालयीन सवलती मिळू शकतात का, याची कसोटी या प्रकरणातून लागणार आहे.




Registration for Periodicals Title "Developed Nations" vide PRGI Registration No. MHMUL/25/A0594. Printed by Shree Samarth Printers, Published by Sanjay Raghunath Sapkale on behalf of Sanjay Raghunath Sapkale, printed at Pune and published at C - 205, Fortune Empress Society, Haandewadi Road, Autade Haandewadi, Haveli, Hadapsar. Resident Editor : Dr. Ashok Tukaram Balgude, Managing Editor : M J Srikant.